


उरण : राज्याचे ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते खोपटे येथे शाळांच्या इमारतीचे उद्घाटन शुक्रवारी करण्यात आले. या समारंभास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, स्थानिक आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिरनेर पं.स.विभाग अध्यक्ष प्रशांत रमेश ठाकूर, सरपंच विशाखा ठाकूर आदी उपस्थित होते. (वृत्त उद्याच्या अंकात)

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २११
www.ramprahar.com

शनिवार, १७ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महाभागाने पाच महिलांशी लग्न करून केली फसवणूक/३
खालापुरातील जांबरुंग धरणाचे काम युद्धपातळीवर/५
किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये रायगडच्या खेळाडूंची चमक/८

# मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे आरक्षण देणार

## राज्य सरकारकडून आश्वासन



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल शुक्रवारी (दि.१६) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे असे आरक्षण जे ओबीसी किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्हाला देता येईल, असे सरकारकडून सांगण्यात आले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षणाबाबत सरकारची भूमिका मांडली. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत त्यांना आधीपासून लागू असलेले आरक्षण लागू असेल, पण ज्यांच्याकडे कुठल्याही नोंदी नाहीत त्यांना याआधी फडणवीस यांच्या सरकारने जे आरक्षण दिले होते तसे सर्व मराठा समाजाला (नोंदी नसलेल्यांनाही) देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य मागासवर्गाचा मराठा सर्वेक्षण अहवाल येत्या २० फेब्रुवारीला विशेष अधिवेशनात मांडला जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी सहा दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. आता राज्य सरकारने मराठा समाजाला स्वतंत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत मुख्यमंत्री म्हणाले, ओबीसी किंवा इतर समाजाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार सुरुवातीपासूनच सकारात्मक आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या त्यांना ती ती प्रमाणपत्रे देण्यात आली. सरकार सकारात्मक असताना आंदोलन करणे उचित राहणार नाही. जरांगे यांनी आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन या वेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

# पनवेलच्या प्रशासकीय भवनाचे काम प्रगतिपथावर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये नागरिकांच्या सुविधेसाठी सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणून प्रशासकीय भवन उभारण्यात येत आहे. या भवनाचे काम प्रगतिपथावर असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १६) याची पाहणी करून आढावा घेतला.

शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी असावीत, जेणेकरून नागरिकांच्या वेळ व पैशांची बचत होईल या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून पनवेल शहरातील पूर्वीच्या तहसीलदार कार्यालयाच्या जागेवर प्रशासकीय भवन साकारत आहे. तळमजला व तीन मजले अशा या भवनाचे काम पूर्णत्वाच्या दिशेने आहे. या कामाची आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी पाहणी केली आणि याबाबतची माहिती अधिकारीवर्गाकडून या वेळी घेतली. (पान २ वर..)




# पेटीएम पेमेंट्स बँकेला आरबीआयचा दिलासा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पेटीएम पेमेंट्स बँकेला डिपॉझिट आणि क्रेडिट व्यवहारांसाठी १५ मार्चपर्यंत मुदत वाढवून दिली आहे. यापूर्वी आरबीआयने २९ फेब्रुवारीनंतर पेटीएम पेमेंट बँकेद्वारे कोणत्याही प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले होते.

३१ जानेवारी २०२४ रोजी रिझर्व्ह बँकेने पेटीएमची बँकिंग सेवा बंद करण्याचा आदेश जारी केला होता, परंतु लोकांचे हित लक्षात घेऊन पेटीएम पेमेंट्स बँकेला आणखी काही वेळ दिला जात आहे, असे आरबीआयकडून सांगण्यात आले आहे.

# भाजप नेते निलेश राणेंच्या ताफ्यातील गाड्यांवर दगडफेक

**गुहागर : प्रतिनिधी**



भाजप नेते माजी खासदार निलेश राणे शुक्रवारी (दि.१६) गुहागर येथील सभेसाठी जात असताना त्यांच्या ताफ्यावर चिपळूणमध्ये आमदार भास्कर जाधव यांच्या कार्यालयासमोर दगडफेक झाली. दगडफेकीच्या घटनेनंतर दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

मुंबई-गोवा महामार्गावर आमदार भास्कर जाधव यांच्या चिपळूणमधील कार्यालयाजवळ भाजप नेते निलेश राणे यांच्या गाड्यांचा ताफा पोहचताच त्यावर दगडफेक झाली. त्यामुळे ठाकरे आणि राणे समर्थक एकमेकांसमोर आले. पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडत जमावाला पांगविले. या पार्श्वभूमीवर चिपळूण येथे सध्या तणावपूर्ण शांतता असून परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



# स्पर्धेच्या युगात कठोर परिश्रम घेऊन यश मिळवा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेऊन अधिकाधिक गुण संपादन करीत यश मिळवावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रिटघर येथे केले.

बोर्ड परीक्षेला प्रारंभ होणार असून या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल तालुक्यातील रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी शुभचिंतन तसेच मिनी सायन्स लॅबचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि.१६) आयोजित करण्यात आला होता. दीपक फर्टीलायझर्स तळोजाच्या आर्थिक सहाय्यातून मिनी सायन्स लॅब सुरू करण्यात आली आहे. या लॅबचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, दीपक फर्टीलायझर्सचे सिनिअर जनरल मॅनेजर सतीश देसाई, संतराम चलवाड, संदीप काकडे, दुंदरे ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी, उपसरपंच जयदास चौधरी, विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य बळीराम भोपी, बाळाराम भोपी, विलास भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, विष्णू भगत, कृष्णा पाटील, पोलीस पाटील दीपक पाटील, माजी सरपंच अनुराधा वाघमारे, जयवंत भोपी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. (पान २ वर..)



### मराठा समाज सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्र्यांना सुपूर्द

# आरक्षणासाठी सरकारचे सर्वतोपरी प्रयत्न -एकनाथ शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. वर्षा निवासस्थान येथे सकाळी हा अहवाल सुपूर्द करतेवेळी आयोगाचे सदस्यदेखील उपस्थित होते.



या वेळी आयोगासह संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अशा साडेतीन ते चार लाख अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. या सर्वेक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बैठका घेऊन युद्धपातळीवर हे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून राज्यात युद्धपातळीवर मराठा व खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. याकामी गोखले इन्स्टिट्युट, आयआयपीएस या नामांकित संस्थेची मदत झाली.

मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार प्रत्येक गावात दवंडी पिटवून सर्वेक्षणास नागरिकांनी माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यामुळे हे सर्वेक्षण अत्यंत जलदगतीने पार पडले.

या कामकाजाकारिता राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते तसेच राज्यातील जमीन अधिग्रहण, जमीन धारणा, जमाबंदी, भूमी अभिलेख, तसेच शासकीय व निमशासकीय नोकरीमध्ये समाजाचे प्रमाण व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाण इत्यदी बाबींची प्रत्यक्ष माहिती मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सर्व विभागांच्या सचिवानी आयोगाला माहिती उपलब्ध करून दिली. याचबरोबर शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगारांची माहितीसुद्धा आयोगास उपलब्ध करून देण्यात आली. याव्यतिरिक्त राज्यात मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने मराठा तरुणांच्या आत्महत्याविषयीचीसुद्धा माहिती आयोगास उपलब्ध करून देण्यात आली.

या वेळी मुख्यमंत्री म्हणाले की, मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य शासनाने मागासवर्ग आयोगाला सांगितले होते. साडेतीन ते चार लाख लोक यासाठी दिवसरात्र काम करीत होते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी केलेल्या प्रयत्नांनी मराठा आरक्षण उच्च न्यायालयात टिकले, मात्र दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयात ते टिकले नव्हते. सादर करण्यात आलेला अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन त्यावर चर्चा होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. आम्ही गेल्या काही महिन्यात अनेक ठोस पाऊले उचलली आहे. आयोगाने आज विक्रमी वेळेत आपला अहवालही सादर केला आहे. २० फेब्रुवारीला विधिमंडळाचे विशेष अधिवेशनदेखील आम्ही बोलाविले आहे. हे सर्व पाहता आपले आंदोलन आंदोलनकर्त्यांनी मागे घ्यावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी या वेळी केले.

अहवाल देतेवेळी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, आयोगाचे सदस्य अंबादास मोहिते, ओमप्रकाश जाधव, मच्छिंद्रनाथ तांबे, ज्योतिराम चव्हाण, मारुती शिंकारे, डॉ. गोविंद काळे, डॉ. गजानन खराटे, नीलिमा सरप (लखाडे), सदस्य सचिव आ. उ. पाटील उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्य विभागाच्या नव्या संकेतस्थळाचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे संकेतस्थळ विभागाच्या कार्यप्रणालीला लोकाभिमुख करणारे ठरेल. सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित सर्वांसाठी हे संकेतस्थळ उपयुक्त ठरणारे असून सर्वांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.



मंत्रालयात मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्य विभागाच्या https://cultural.maharashtra.gov.in/ या नव्या संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, उपसचिव नंदा राऊत, अवर सचिव बाळासाहेब सावंत व सुमंत पास्ते, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, सांस्कृतिक कार्य संचालक विभिषण चवरे, दार्शनिका विभागाचे कार्यकारी संपादक आणि सचिव डॉ. दिलीप बलसेकर आदी या वेळी उपस्थित होते.

या नव्याने तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळावर विभागातील विविध कार्यासने, क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे आदींची माहिती देण्यात आली आहे. यावेळी अधिनस्त कार्यालये असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, सांस्कृतिक कार्य संचालनालय, पुराभिलेख संचालनालय, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, दर्शनिका विभाग, रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य हिंदी– सिंधी– गुजराती साहित्य अकादमी, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव आणि कोल्हापूर चित्रनगरी यांची माहितीही देण्यात आली आहे.

याशिवाय, विभागांची एकत्रित माहिती. विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे आणि व्हिडिओच्या समावेशाने हे संकेतस्थळ वापरकर्त्यांना अतिशय उपयुक्त ठरणार आहे. सांस्कृतिक विभागाच्या विविध योजना, पुरस्कार, स्पर्धा व शिबिरे, महोत्सव, प्रशिक्षण कार्यक्रम आदींची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

## सततच्या हवामान बदलाने नागरिक हैराण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने होणाऱ्या बदलांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. अनेकांना सर्दी, खोकल्याचा त्रास सुरू झाला असून दवाखान्यांमध्ये गर्दी वाढल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

सध्या जिल्ह्यातील अनेक ठिकाणी सकाळी थंडी, दिवसभर कडाक्याचे ऊन तर रात्री पुन्हा थंडी असा सतत बदल अनुभवास येत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ लागला आहे.

विशेषतः लहान मुलांना या सततच्या वातावरणातील बदलाने सर्दी, खोकल्याचा त्रास जास्त प्रमाणात जाणवत आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रात एक लाखांपेक्षा जास्त मुलांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या दगडी शाळा क्र.२ येथे मंगळवारी (दि.१३) राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा व अंगणवाड्यांतील सुमारे एक लाख ३१ हजार मुलांना जंतनाशकाच्या गोळ्या देण्यात आल्या.



या कार्यक्रमास अतिरिक्त सहाय्यक संचालक ठाणे डॉ. चाकूरकर, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, माजी नगरसेवक दर्शना भोईर, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रेहाना मुजावर व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. एक वर्षापासून ते पौगंडावस्थेतील मुलामुलींना जंताच्या आजाराचा सामना करण्यासाठी फेब्रुवारी आणि ऑगस्ट महिन्यात राष्ट्रीय जंतनाशक दिन शासनाच्या वतीने घेण्यात येतो.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनुसार मातीतून प्रसार होणाऱ्या कृमींचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी ही सहा महिन्यांमध्ये दोनदा ही मोहीम राबविली जाते. मातीत मुलांनी खेळल्यावर त्यांना कृमीदोषांचा संसर्ग होत असल्याचे निर्देशनास आले. याचा परिणाम म्हणजे मुलांमध्ये कुपोषण आणि रक्तक्षय होऊन त्यांना सतत थकवा जाणवतो. त्यांची मानसिक वाढ व मानसिक विकास पूर्णत: होत नाही. यासाठी राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे आयोजन करण्यात येते.

## तळोजा परिसरातून दोन बांगलादेशी नागरिकांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

खिडूकपाडा भागात बेकायदा वास्तव्यास असलेल्या दोन बांगलादेशी नागरिकांना दहशतवादविरोधी पथकाच्या नवी मुंबई युनिटने अटक केली आहे. बेलाल मोल्ला (३३) व सूल शेख (३३) अशी या दोघांची नावे असून हे दोघेही २५ वर्षांपूर्वी भारतात घुसखोरीच्या मार्गाने आल्याचे व तेव्हापासून ते भारतात ठिकठिकाणी राहात असल्याचे चौकशीतून उघडकीस आले आहे.


हे दोघे बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्यास असल्याची माहिती दहशतवादविरोधी पथकाच्या नवी मुंबई युनिटला मिळाली होती. त्यानुसार दहशतवादविरोधी पथकातील पोलीस उपनिरीक्षक मीरा लाड, विजयकुमार पाटील व त्यांच्या पथकाने तळोजा नावडे येथील खिडुकपाडा येथील एका घरावर छापा मारला. या दोघांनी लहानपणी त्यांच्या आई–वडिलांसह घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश केला होता. त्यानंतर बेलाल २०१० मध्ये तर रसूल शेख हा २००९मध्ये मूळगावी गेले होते. पानंतर त्यांनी २०१३–१४मध्ये भारत बांग्लादेश सीमेवरील बेनापोले–बोनगा येथून पुन्हा भारतात प्रवेश केला.

## खोपोली ताकईत सांडपाणी रस्त्यावर; परिसरात दुर्गंधी, कारवाईची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील ताकई येथील सोसायटीतील सांडपाणी ताकई आडोशी रस्त्यावर आल्याने या पाण्याच्या दुर्गंधीमुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाक मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. या परिस्थितीला कारणीभूत असलेल्या सर्वांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

खोपोली शहरातील एक टोक मानल जाणार ताकई येथून आडोशीकडे जाणारा रस्ता आहे. हा रस्ता आठ गावांना जोडत असून या रस्त्यावर शेकडो कारखाने आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून परिसरातील कारखान्यातील कामगार व ग्रामस्थ रोज प्रवास करीत असतात. याच रस्त्याशेजारी ताकई येथे सोसायटी आहे. येथे शंभरहून अधिक फ्लॅट आहेत. दुसऱ्या बाजूलाही पाच ते सहा इमारती आहेत. या इमारतीमधून रोज सांडपाणी बाहेर पडत असते.



सध्या हे सांडपाणी रस्त्यावर येत आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे सांडपाण्याने भरून रस्त्याला पावसाळ्याचे स्वरूप आले आहे, तसेच या सांडपाण्याला मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रवास करताना, नाक मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सांडपाण्याने भरलेले खड्डे चुकविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

याच दुर्गंधीमुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्या आहेत तर खड्डे चुकविताना दुचाकीस्वारांचे अपघात घडण्याचे प्रकारही घडले आहेत. नागरिक व प्रवाशांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

पान १ वरुन

### पनवेलच्या प्रशासकीय भवनाचे काम प्रगतिपथावर

या पाहणीवेळी तहसीलदार विजय पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मिलिंद कदम, विद्युत विभाग उपअभियंता श्रीमती जाधव, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक भगत आदी उपस्थित होते. प्रशासकीय भवनाचे काम पुढील दोन महिन्यांत पूर्ण करून एप्रिल किंवा मे महिन्यात उद्घाटनानंतर हे भवन नागरिकांसाठी खुले होईल, असे या वेळी अधिकारीवर्गाने सांगितले.

### स्पर्धेच्या युगात कठोर परिश्रम घेऊन यश मिळवा

विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या तसेच क्रीडा स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा, क्रीडा प्रमुख अमित पाटील, शासकीय ग्रेड परीक्षेबद्दल कलाशिक्षक चेतन भोईर आणि यशस्वी विद्यार्थ्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला, तर स्टेज मॅनेजमेंटवरील संशोधन इंटरनॅशनल जनरल ऑफ क्रिएटिव्ह रिसर्चमध्ये प्रसिद्ध झाल्याबद्दल माळी मॅडम, शासकीय एनएमएमएस परीक्षेत विद्यालयाचे श्रेया बोराडे, अभय सुरवडे या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळाल्याबद्दल तसेच एनएमएमएस विभाग प्रमुख गंधे आणि रयत रायगड विभाग वक्तृत्व स्पर्धेत विभागीय पातळीवर प्रथम क्रमांकप्राप्त आदिती भोपी, विभाग प्रमुख डाऊर मॅडम आणि विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

## पळस्पे फाटा येथून रिक्षाचालक बेपत्ता

**पनवेल** : पळस्पे फाटा येथे राहणारा रिक्षाचालक घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेला आहे. तो अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.



निषाद जमात अली पठाण (वय ४५) असे या व्यक्तीचे नाव असून त्याचा रंग सावळा, उंची ५.६ फुट, डोक्याचे सफेद व वाढलेले, अंगात निळा व काळा पट्ट्या असलेला शर्ट, काळ्या रंगाचा पॅन्ट घातली आहे. डोळ्यावर चष्मा आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२३३३ यांच्याशी संपर्क साधावा.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत भोकरपाडा येथे जनजागृती



**पनवेल : प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे हद्दीतील भोकरपाडा हिरानंदानी कॉम्प्लेक्स योटा सेंटर येथे सुखविंदर सिंग अप्पर पोलीस महासंचालक (वा), तानाजी चिखले पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस रायगड परिक्षेत्र, घनश्याम पालंगे पोलीस उप अधीक्षक महामार्ग पोलीस रायगड विभाग तसेच गौरी मोरे महामार्ग पोलीस पनवेल विभाग, गणेश बुरकुल प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे यांच्या मागदर्शनाखाली रस्ते सुरक्षा अभियान व जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

एखाद्या वाहनात तांत्रिक बिघाड झाल्यास (९८२२४९८२२४) या मोबाईल क्रमांकावर कॉल करून मदत मागवून वाहनाच्या पाठीमागे कोण लावून अथवा बॅरीकेटिंग करून घ्यावी, अपघाताबाबत (९८३३४९८३३४/१००/११२/१०८/८६५२०८५५००) या क्रमांकावर माहिती द्यावी असे सांगून मृत्यूंजय दुत व स्व. बाळासाहेब ठाकरे विमा अपघात योजनेबाबत माहिती दिली. दरम्यान महामार्गावर नियमांचे माहितीपत्रकांसह दुचाकीस्वारांना १०० मोफत हेल्मेट वाटप करण्यात आले.

## एनएमएमएस परीक्षेत नवघर शाळेचे घवघवीत यश

### उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार

**पाली : प्रतिनिधी**

एनएमएमएस परीक्षेत राजिप नवघर शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले आहे. या विद्यार्थ्यांचा रायगड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) सुनील भोपळे यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला.

२०२३–२४ या शैक्षणिक वर्षात राजिप नवघर शाळेतील इ. आठवीचे एकूण १३ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेला बसले होते. या परीक्षेत नवघर शाळेतील १३ पैकी सात विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना उपशिक्षणाधिकारी सुनिल भोपळे यांनी प्रत्येकी १११ रुपये बक्षीस दिले, तसेच गटशिक्षणाधिकारी कार्यालय पाली सुधागड यांनी सन्मानपत्र आणि शाळेतर्फे भेटवस्तू देऊन भोपळे यांचा सत्कार केला.

व्हीएसटीएफचे रायगड जिल्हा कार्यकारी अधिकारी रत्नशेखर गजभिये यांनी, विद्यार्थ्यांचे कौतुक करून राज्यस्तरीय व्हीएसटीएफ कमिटी शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी येणार आहे तेव्हा त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस देण्याचे जाहीर केले.

गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे यांनी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी आर्यन चव्हाण, आयुष सुतार, ऋग्वेद कुंभेकर, आर्या वाघमारे, जान्हवी भवार, श्रावस्ती जाधव, आयुष जाधव या सर्वांना अभिनंदन पत्र देऊन कौतुक केले.



## दुखवटा

### शरदचंद्र ठाकूर



**उरण** : चिरनेर मूळपाडा येथील शरदचंद्र हरिश्चंद्र ठाकूर (वय ६३) यांचे बुधवारी (दि.१४) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, आई–वडील, भाऊ, बहिणी, पुतणे, जावई, नातवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी २३ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र नाशिक येथे होईल, तर उत्तरकार्य विधी २५ फेब्रुवारी रोजी चिरनेर मूळपाडा येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती ठाकूर परिवारातर्फे देण्यात आली.

### सौरभ गुजर



**पनवेल** : ठाकरे गटाचे करंजाडे शहर संपर्क प्रमुख चंद्रकांत गुजर यांचे थोरले सुपुत्र सौरभ गुजर यांचे अकाली निधन झाले. त्यांचा दशक्रीया विधीकार्य २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजता दादर शिवाजी पार्क येथे होईल, तसेच बारावे, तेरावे कार्य हे २४ फेब्रुवारी रोजी त्यांच्या राहत्या घरी होईल. त्यांच्या निधनाबद्दल करंजाडे नोड प्लॅट ओनर असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आहे

### चंद्रकांत अडसुळे

**पेण** : आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते, भारतीय बौद्ध महासभेचे पेण तालुका संघटक चंद्रकांत चांगू अडसूळे यांचे बुधवारी (दि. १४) वयाच्या ७४व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन नाती असा परिवार आहे. त्याच्या निधनाची बातमी समजताच त्यांच्या अंत्ययात्रेला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांचा पुण्यानोमोदन कार्यक्रम व शोकसभा २५ फेब्रुवारी रोजी अंतोरे येथे होणार आहे.



# थकबाकीदारांविरोधात पनवेल महापालिकेची कारवाई सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांविरोधात महापालिकेने कारवाईच्या दिशेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार महापालिका थकबाकीदारांच्या स्थावर अथवा जंगम मालमत्ता अटकावणी करून त्याची जाहीर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणार आहे. त्यासाठी महापालिकेने विविध दैनिकांमध्ये थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध केली आहे.



महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागामधील सुमारे तीन लाख ५० हजार मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आली आहे. यातील ७७ हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ताकर भरला आहे. उर्वरित दोन लाख ८० हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला नाही. शुक्रवारी (दि.१६) अखेर एकूण ५४२ कोटी ७३ हजाराची वसुली महापालिकेने केली आहे, तसेच सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये १७ एप्रिलपासून आजपर्यंत २५५ कोटी इतकी वसुली झाली आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले, परंतु आता महापालिकेने थकबाकीदारांविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांचा खूप जास्त मालमत्ता कर भरावयाचा राहिला अशा सुमारे १०१ औद्योगिक, १०७ अनिवासी, १०० निवासी थकबाकीदारांची यादी १० दैनिकांमध्ये प्रसिद्ध केली आहे.

मालमत्ता धारकांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरावा यासाठी महापालिकेने सातत्याने विविध सवलती दिल्या होत्या. अखेर मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने मालमत्ताधारकांना वसुलीच्या नोटीस देण्यास पालिकेने सुरुवात केली आहे. आता महापालिका थकबाकीदारांच्या स्थावर अथवा जंगम मालमत्ता अटकावणी करून त्याची जाहीर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणार आहे. त्यासाठी थकीत मालमत्ताकराच्या कारवाई अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, तसेच मालमत्ता विक्री व खरेदीस प्रतिबंध असल्याने विक्री खरेदी व्यवहार करता येणार नाही, अशा आशयाचे महापालिकेने विशेष स्टिकर्स छापले आहेत.

महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP मोबाईल ॲप विकसित केले आहे, तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाभागाने पाच महिलांशी लग्न करून केली फसवणूक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पाच महिलांशी लग्न करून फसवणूक करणारा आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शांतीलाल यशवंत खरात (वय ५१, रा. ग्लोरी हौसिंग सोसायटी, गोकुळ टाऊनशिप) हा रियल इस्टेट क्षेत्रात कार्यरत असून त्याने लग्नाच्या वेबसाईटवर लग्नासाठी नोंदणी केली व फिर्यादी महिलेस लग्नासाठी मागणी घातली. त्याने माहिती लपवून व फिर्यादी महिलेस विश्वासात घेऊन यश मंगल कार्यालय, रिस येथे लग्न केले. चार-पाच महिन्यानंतर आरोपी फिर्यादी महिलेस शारीरिक त्रास व शिवीगाळ, छळ करून पैसे मागू लागला. महिलेने आपले लग्न मोडू नये म्हणून भावाकडून व स्वतःकडील कमीत कमी सात लाख ५५ हजार रूपये आरोपी शांतीलाल यशवंत खरात यास दिले. आरोपीने फिर्यादी महिला माहेरी गेली असताना तिला न सांगता तिचे दागिने गहाण ठेवून त्यावर कर्ज घेतले. याबाबत फिर्यादीने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुवर्णा खाड्ये यांनी विशेष तपास केला असता आरोपी शांतीलाल यशवंत खरात याने एकूण पाच लग्न झाले असून त्याला दोन मुली आहेत. त्याच्या पहिल्या पत्नीचा मृत्यू झाला असून मृत्यूचा दाखला पोलिसांनी प्राप्त केला आहे. दुसऱ्या पत्नीचीही फसवणूक केल्याबाबत घटस्फोटाचा खटला बांद्रा कोर्टामध्ये सुरू आहे. तिसरी पत्नी हिच्याशी २०१५ रोजी मंदिरात जाऊन लग्न केले आहे. ज्या मंदिरात लग्न केले आहे. त्या मंदिराच्या रजिस्टरमध्ये आरोपी व त्याच्या तिसऱ्या पत्नीची नोंद आहे. चौथ्या पत्नीशीसुद्धा सेतु कार्यालयात नोंद असून मंदिरात जाऊन लग्न केले आहे. आरोपी शांतीलाल यशवंत खरात याने चार लग्न करून तो विधूर आहे व दोन मुली आहेत अशी बतावणी करून महिलेची फसवणूक करून तिचा शारीरिक छळ करीत आहे असे दिसून येत आहे. रसायनी पोलीस ठाण्यात आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपीला रसायनी पोलिसांनी शिताफीने नेरल येथून अटक करून तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली. यानंतर आरोपीला न्यायालयात हजर केले असता जामिनावर सुटका झाली.





**पनवेल : येथील टपाल नाका येथे नव्याने सुरू झालेल्या श्री महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत उपस्थित होते. उद्योजक मंगेश पिळविलकर यांनी त्यांचे स्वागत केले.**

## बसच्या धडकेत वृद्ध महिलेचा मृत्यू

**पनवेल** : शहरातील एसटी डेपोत जाणाऱ्या बसच्या धडकेत एका ६३ वर्षीय महिला ठार झाली आहे. मृत महिलेचे नाव कल्पनाचंद लक्ष्मणचंद ठाकूर असे आहे.

तक्का परिसरातील सिद्धी हाऊस इमारतीमध्ये राहणाऱ्या कल्पनाचंद या सकाळी आपल्या नातीला बसथांब्यापर्यंत सोडण्यासाठी गेल्या असता किंग्ज इलेक्ट्रॉनिक्स दुकानासमोर त्यांना भरधाव वेगाने जाणाऱ्या बस (एमएच ०७ सी ७२१३) ने धडक दिल्याने त्या जागीच ठार झाल्या. बसचालक मन्सूर शेख याच्यावर पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

# करंजाडेत विविध उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## सरपंच मंगेश शेलार यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : प्रतिनिधी**

सरपंच मंगेश शेलार यांचा वाढदिवस करंजाडेमध्ये शुक्रवारी (दि.१६) सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वेळी आरोग्य शिबिर, आभा कार्ड, आयुष्मान कार्ड, ज्येष्ठ नागरिक दाखले, नवीन मतदार नोंदणी व महिलांसाठी हळदीकुंकू असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.






सरपंच मंगेश शेलार यांचे वाढदिवसानिमित्त सकाळी सनराईस हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. डॉ. राहुल टेंबे, जावेद खान, सुमित सोनी, राहुल सावनकर, गजानन पांड्या, मनोहर काकडे, जितेंद्र जगदाळे व नायर हॉस्पिटलचे डॉक्टरांनी तपासणी केली. पोलीस चौकीजवळ आयुष्मान कार्ड आभा कार्ड ज्येष्ठ नागरिक दाखला आधार कार्ड, पॅन कार्ड, ई- श्रम कार्ड शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन तानजी शेलार यांचे हस्ते करण्यात आले. शेकडो नागरिकांनी याचा लाभ घेतला.

महिलांसाठी हळदीकुंकू व मंगळागौरीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला वर्षा ठाकुर यांनी भेट दिली. भाजपचे विभागीय अध्यक्ष कर्णाशेठ शेलार, तालुका उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे, उपसरपंच सागर आंग्रे, महिला उपाध्यक्ष सुषमा मयेकर, वैशाली जगदाळे व सर्व सदस्य उपस्थित होते.







**पनवेल : अयोध्येत प्रभू श्री रामचंद्रांचे दर्शन सामान्यांना घेता यावे यासाठी रोहा तालुका भाजपच्या वतीने रामभक्तांना विशेष रेल्वेने पाठवण्याचे प्रयोजन केले आहे. १९० रामभक्तांनी गुरुवारी विशेष रेल्वेगाडीने अयोध्येकडे प्रस्थान केले. ही विशेष रेल्वे पनवेल स्थानकामध्ये दाखल झाल्यावर सर्व भक्तांचे भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस राजेश मपारा, मिलिंद पाटील, बिपीन महामुनकर, युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# सीकेटी महाविद्यालयात लोगो डिझाईन आणि ३-डी मॉडेल प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व विज्ञान संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टिक-पांढरे प्रदूषण या विषयावर लोगो डिझाईन स्पर्धेचे शुक्रवारी (दि.१६) आयोजन करण्यात आले होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते तसेच नामांकित मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हमीद दाभोलकर हे उपस्थित होते, तसेच महाविद्यालयचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी उपस्थिती दर्शविली.

या कार्यक्रमामध्ये १५७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तसेच या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राणीशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. वाय. एस. मुनिव व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. ए. एन. वेमुला यांची उपस्थिती लाभली. माहिती तंत्रज्ञान विभागाने विज्ञान संघटनेच्या मार्गदर्शनाखाली ३-डी मॉडेल प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्रदर्शनासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एन. एस. पोर्जी यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रदर्शनात विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. आय. एस. ठाकरे यांनी मॉडेल्स ची पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# रयत शिक्षण संस्था म्हणजे संस्कारांचे विद्यापीठ

## उत्तम कांबळे यांचे गौरवोद्गार

**उरण : वार्ताहर**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेजमध्ये वीर वाजेकर यांची पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ८४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, साहित्यिक व विचारवंत उत्तम कांबळे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

उत्तम कांबळे यांनी, मी आज जो काही आहे, त्यामध्ये रयत शिक्षण संस्थेचा मोठा वाटा आहे. ही संस्था म्हणजे संस्कारांचे विद्यापीठ असल्याचे गौरवोद्गार काढले.

या वेळी सर्व गुणवंत प्राध्यापक, विद्यार्थी, खेळाडूंना व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांनी केले. महाविद्यालयाच्या कामकाजाचा आढावा कार्याध्यक्ष श्रीकांत गोतपागर यांनी घेतला. पारितोषिक वितरणाचे वाचन आचार्य डॉ. विलास महाले, राहुल पाटील, डॉ. श्रेया पाटील यांनी केले.

तुकाराम हरी वाजेकर विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, मीनाक्षी म्हात्रे, प्रभाकर कडू, रवीशेठ वाजेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील व डॉ. श्रेया पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन अमोल ठक्कर यांनी केले.



# पीएएसच्या शाळांमध्ये पारितोषिक वितरण समारंभ



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एज्युकेशन सोसायटी (पीएएस) संचालित शाळांमध्ये वार्षिक पारितोषिक समारंभ तसेच दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ झाला. या वेळी अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांच्यातर्फे संस्थेला पाच लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

याकुब वेग हायस्कूल व जुनियर कॉलेज, याकुब बेग प्राथमिक शाळा व पीईएस इंग्लिश स्कूल व जुनियर कॉलेज पनवेल शाळांचा वार्षिक पारितोषिक समारंभ तसेच दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाते, सहाय्यक पोलीस निरीक्षक बजरंग राजपूत, माजी नगरसेवक मुकीत काझी यांच्या उपस्थितीत झाला.

अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते. संस्थेच्या पदाधिकारी व उपस्थितांचे स्वागत याकुब बेग शाळेचे प्राचार्य आसीम पटेल यांनी केले. तीनही शाळेच्या प्राचार्यांनी वार्षिक अहवाल सादर केला.



**मोहोपाडा : येथील साईबाबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी जाऊन दर्शन घेतले. मंदिर प्रतिष्ठानतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले.**

## संपादकीय

# रोख्यांचा रोख कोणाकडे?

निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांना ज्या काही आर्थिक कसरती कराव्या लागतात, त्यातूनच काळ्या पैशाचा महापूर येतो. हे पाहूनच निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडली गेली होती. निवडणूक रोखे हा एक सर्वमान्य असा सुवर्णमध्य होता. त्यामध्ये पुरेशी पारदर्शकता नाही असे सहज म्हणता येते, परंतु त्यामुळेच निवडणूक काळातील वेड्यावाकड्या व्यवहारांना काही प्रमाणात तरी आळा बसू शकेल अशी अपेक्षा होती.

**निवडणूक खर्चासाठी प्रत्येक राजकीय पक्षाला अधिकृतरित्या पैशाची तरतूद करावी लागते आणि तशी ती करताना सर्व व्यवहार खुले आणि पारदर्शक पद्धतीने व्हावेत अशी सर्वांचीच अपेक्षा असते. या अपेक्षेत काहीच चुकीचे नाही, किंबहुना निवडणुकांचा खेळ खेळण्यासाठी राजकीय पक्ष एवढाला पैसा आणतात कुठून हे कुतुहल सर्वसामान्यांमध्ये असते. अंदाजित आकडेवारीनुसार २०१९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी एकूण ५० हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला होता. यामध्ये मतदानयंत्रे आणि निवडणूक यंत्रणेचा खर्च अनिवार्य असतोच. कायदा व सुव्यवस्थेवरदेखील बरीच मोठी रक्कम खर्ची पडते, परंतु सर्वाधिक खर्च होतो तो प्रचाराच्या रणधुमाळीत. ५० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम सार्वत्रिक निवडणुकीपायी खर्च होते हे ऐकून सामान्य नागरिकांचे डोळे विस्फारतील. याचा अर्थ अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीपेक्षाही अधिक पैसा भारतातील सार्वत्रिक निवडणुकांवर खर्च होतो. उमेदवारांचा प्रचार, ज्येष्ठ नेत्यांच्या हेलिकॉप्टर-विमाने आदी वाहतुकीवर होणारा खर्च आणि अनेक विशेष बाबी यामुळे राजकीय पक्षांना निवडणुकीच्या काळात पैशाच्या थैल्या मोकळ्या सोडाव्या लागतात. यामध्ये वृत्तपत्रे, टीव्ही वाहिन्या, आणि डिजिटल माध्यमांवरील जाहिरातींचा खर्च अफाट असतो. साहजिकच हे पैसे राजकीय पक्षांना विविध मार्गांनी गोळा करावे लागतात. त्यातले सगळेच मार्ग सर्वमान्य आणि कायदेशीर असतात असे मानणे भाबडेपणाचे होईल. दुर्दैवाची बाब म्हणजे निवडणूक खर्चासाठी आपल्या देशात अधिकृत तरतूद करण्याची सोयच नाही. ही भारतीय लोकशाही व्यवस्थेतील एक महत्त्वाची उणीव आहे आणि ती दूर व्हायला हवी यात शंका नाही. २०१८चा अर्थसंकल्प मांडताना तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी निवडणूक रोखे आणण्याचा मुद्दा मांडला होता. स्टेट बँकेच्या निवडक शाखांमध्ये वर्षाच्या प्रत्येक तिमाहीला दहा दिवस या रोख्यांची विक्री होत असे. एक हजार रुपयांपासून ते एक कोटी रुपयांपर्यंतचे कितीही रोखे खरेदी करून कोणीही व्यक्ती, संस्था अथवा कंपनी या रोख्यांमार्फत हव्या त्या पक्षाला निधी उपलब्ध करून देऊ शके, परंतु या निधीचे हस्तांतर कोणाकडून कोणाला, किती आणि कसे होते याबद्दल जनतेमध्ये स्पष्टता राहत नव्हती. असे असले तरी हा संपूर्ण व्यवहार स्टेट बँकेमार्फत होत असल्यामुळे काळ्या पैशाचा महापूर येण्यापासून अटकाव होत होता हे मात्र खरे, कारण एका बँक खात्यामधून दुसऱ्या बँक खात्यामध्ये पैसे वळते होत असल्यामुळे रिझर्व्ह बँक आणि वेळ पडल्यास प्राप्तीकर खात्याला याचा तपशील मिळू शकणार होता. याचाच अर्थ या रकमांबाबत जनतेला कळले नाही तरी तपास यंत्रणा अंधारात राहणार नव्हत्या. साहजिकच काळ्या पैशाचे व्यवहार त्यामुळे थांबवले जाणार होते. सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वाचा निकाल देताना निवडणूक रोखे बेकायदेशीर ठरवले हा केंद्रातील भाजप सरकारला धक्का मानला जातो, परंतु प्रत्यक्षात हा निकाल विरोधी पक्षांनाच अधिक अडचणीत आणणारा आहे हे येत्या काळात लक्षात येईलच.**

# वानरांचा वाढता वावर शेतकऱ्यांना डोकेदुखी

**खबरबात**
**महेश शिंदे**



गेली काही वर्षांत महाड तालुक्यातील ग्रामीण भागात जंगलात राहणाऱ्या वानरांनी गावाची वाट धरल्याने शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. गावात नासधूस करणाऱ्या या वानरांनी शेतातदेखील धुडगूस घातला आहे. या माकडांच्या टोळ्यांकडून शेतात लागवड केल्या जाणाऱ्या पालेभाज्या, नाचणी तसेच फळांची नासधूस केली जात आहे. यातून अनेक शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले आहे.

मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, जमीन खरेदी-विक्री, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, जंगलात वाढलेला मानवी हस्तक्षेप आदी कारणांमुळे ग्रामीण भागात जंगलात वास्तव्यास असलेल्या वानरांच्या टोळ्या गावात दाखल होत आहेत. शेतकरी एकदा का शेतात कामाला गेला की या वानरांचा उपदव्याप सुरू होतो. तालुक्यातील दाभोळ गावातील ग्रामस्थ तर हा त्रास गेली अनेक वर्षे सहन करीत आहेत. कौल उखडून घरात प्रवेश करीत धान्याची नासाडी, सामानाची नासधूस केली जात आहे. ही परिस्थिती आता तालुक्यातील डोंगर भागात वास्तव्यास असलेल्या गावांमध्ये दिसू लागली आहे. भातपीक काढल्यानंतर शेतकरी कडधान्य, इतर पालेभाज्या काढण्यावर भर देतो, मात्र गेली काही वर्षांत माकडांचा त्रास वाढल्यामुळे शेतकरी शेतात जाण्यासदेखील धजावत नाही. शेतात लावल्या जाणाऱ्या पालेभाज्या, बांधावर असलेल्या फळांची कडधान्याची रोपे उखडून काढली जात आहेत. नासधूस करीत या टोळ्या पुन्हा जंगलात जात आहेत. यापूर्वी कधीतरी दिसणारे हे चित्र आता दररोज होत असल्याने शेतकरीदेखील हैराण झाले आहेत.

मुळात माकड आणि वानर या दोन प्रजाती महाड तालुक्यातील डोंगराळ जंगलात आढळतात. माकड हे जरी माणसाळत असले व तेवढे उपद्रवी नसले तरी घाटात प्रवास करताना प्रवाशांना यांचा मोठा त्रास होत असतो. माकड हे आकाराने लहान, तर वानर हे आकाराने मोठे असते. वानर ही जात माणसाळत नाही तसेच शेतातील व गावातील उपद्रवानंतर पुन्हा जंगलात निघून जातात. महाड तालुक्यात बहुतांश भाग हा दुर्गम, डोंगर भागात वसलेला आहे. अनेक गावे ही डोंगराला लागूनच आहेत. जंगलात पूर्वीप्रमाणे वन्य प्राण्यांना सहज उपलब्ध होणारी फळे, खाद्य दुर्मिळ झाले आहे. गावातील तरुण शहरात दाखल होऊन घरे बंद झाली असली तरी गावाशेजारी असलेल्या जमिनी मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्यामुळे प्लॉटिंगच्या नावाखाली वनतोड केली जात आहे. यामुळे वन्यप्राण्यांचे घरच मानवी हस्तक्षेपामुळे उद्ध्वस्त होत आहे. त्यातच भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस घटत असल्याने जंगलात असलेले पिण्याचे पाण्याचे स्त्रोतदेखील आटले आहेत. यामुळे वन्य प्राण्यांनी खाद्य आणि पिण्याच्या पाण्यासाठी गावाची वाट धरली आहे. वानरांच्या टोळ्यांसह डुक्कर, खवले मांजर आदी वन्य जनावरे गावाशेजारी असलेल्या शेतात येऊन नासधूस करीत आहेत.

महाड तालुक्यात विन्हेरे, फौजी आंबवडे, आंबिवली, दाभोळ, वरंध, पारमाची, माझेरी, वारंगी, रायगडवाडी, देशमुख कांबळे, शिवथर, आदी गावातून वानरांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या गावातून होत असलेल्या शेतातील पालेभाजी, नाचणी, वरी, आदींचे मोठे नुकसान केले जाते. वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी यापूर्वी शेतकरी पारंपरिक उपाय म्हणून वाद्य वाजवणे किंवा शेतात वास्तव्य करून शेकोटी पेटवणे हे उपाय काळाच्या ओघात मागे पडले आहेत. काही शेतकऱ्यांनी वानराला मारुन त्याला आंब्याच्या बागेत उलटे लटकून ठेवले. त्या मेलेल्या वानराला पाहून काही दिवसांसाठी हा त्रास कमी होत असे, मात्र वानर हे वन्यप्राणी जमातीत येत असल्याने ते संरक्षित आहेत. अशाने त्यास मारल्यास गुन्हा दाखल होऊ शकतो, तर यासाठी शेतात वास्तव्य किंवा वाद्य वाजवणे शेतकऱ्यांनी आता सोडून दिले आहे. तरुणांनी नोकरीनिमित्त शहर गाठल्याने गावात आता फक्त वयोवृद्ध नागरिक राहत असल्याने ज्यांना शक्य होते तेच शेती करीत आहेत. यामुळे वन्यप्राण्यांनी शेतात आपला वावर वाढवला आहे.

याबाबत स्थानिक पातळीवर असलेल्या शासकीय यंत्रणांनादेखील शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. कृषी आणि वन विभागाने सयुंक्तपणे याबाबत पावले उचलली पाहिजेत. वनविभागाने या माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना यापूर्वी फटाके भेट दिले होते, मात्र फटाके वाजवल्यानंतर काही तास माघारी पडलेल्या वानरांच्या टोळ्या पुन्हा शेतात दाखल होतात. यामुळे वन्यप्राण्यांना जंगलातच खाद्य आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत किंवा जंगलातील काही भाग संरक्षित करून त्यामध्ये फळांची रोपे, आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध केल्यास हा त्रास कमी होण्याची शक्यता आहे. वनविभाग आणि कृषी विभागाने याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. वन्यप्राण्यांचा वावर शेतात वाढू लागल्याने शेतीचे मोठे नुकसान होत आहे. घराशेजारी असलेले कोकम, आंबा, पेरू, पपई आदी फळेदेखील तोडून टाकली जातात. पालेभाजी उखडून टाकली जात असल्याने शेतकरी नुकसान सहन करीत आहे. वनविभाग आणि कृषी विभागाने याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी आता शेतकरी करू लागले आहेत.

# कवी, नाटककार पुरुषोत्तम रेगे

श्रेष्ठ मराठी कवी तसेच कादंबरीकार, नाटककार, समीक्षक व संपादक पुरुषोत्तम शिवराम रेगे यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

पुरुषोत्तम रेगे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील मिठबाँ येथे झाला. शिक्षण मुंबई व लंडन येथे बीए व बीएस्सीपर्यंत. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी बीएस्सी ही पदवी मिळविली होती. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विविध महाविद्यालयांतून त्यांनी काम केले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले.

'सुहृद चंपा' आणि 'रूप कथ्थक' ही दोन टोपण नावे त्यांनी अनुक्रमे साधना आणि इतर कविता (१९३१) यातील कवितांसाठी, तर 'रूपकथ्थक' हे टोपण नाव रंगपांचालिक आणि दोन नाटके (१९५८) या पुस्तकासाठी घेतली होती. त्यांचे अन्य साहित्य पु.शि. रेगे या नावानेच प्रसिद्ध झाले. उदा., छांदसी नावाचा १९६२ साली प्रसिद्ध झालेला समीक्षात्मक लेखांचा संग्रह.



साधना आणि इतर कविता या त्यांच्या काव्यसंग्रहानंतर फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३), दोला (१९५०), गंधरेखा (१९५३), पुष्कळा (१९६०), दुसरा पक्षी (१९६६) आणि प्रियाळ (१९७२) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. १९४५पर्यंतची त्यांची कविता मुक्तच्छंदात लिहिलेली असली, तरी नवकाव्य म्हणता येईल अशीही ती नव्हती. ते वळण १९४५नंतरचे, पण तरीही ते मर्ढेकरी नवकाव्याच्या वळणाचे नव्हते. त्याचे स्वरूप खास रेगेय म्हणता येईल असे होते.

रूपकथ्थक (१९५६) व मनवा (१९६८) हे त्यांचे दोन कथासंग्रह असून त्यांच्या कथांतूनही त्यांच्या कविमनाचे नाजूक पदर व त्यांचे अल्पाक्षरमणीयत्व जाणवते. यातील काही कथा गुजराती, फ्रेंच, जर्मन, स्वीडिश, स्पॅनिश ,रशियन व चिनी या भाषांत भाषांतरित झाल्या आहेत.

सावित्री (१९६२), अवलोकिता (१९६४), रेणू (१९७३) आणि मातृका (१९७८) या रेगे यांच्या चार कादंबऱ्या काव्यात्म व अर्थगर्भ आहेत. त्यांतील भावविश्व गूढ, तत्वस्पर्शी, सखोल व समृद्ध आहे. सावित्री ही पत्ररूप कादंबरी असून सावित्री आणि अवलोकिता या कांदबऱ्या परस्परांना पूरक ठरतील अशा स्वरूपाच्या आहेत. रेणू व मातृका त्याहून वेगळ्या आहेत. त्यामधूनही त्यांच्या कविमनाचे स्त्रीत्वाविषयीचे आकर्षण प्रकट होते.

रेगे यांनी १९६५मध्ये रशियातील. मॉस्को येथे लघुकथा या विषयावर आयोजित परिसंवादात एक भारतीय प्रतिनिधी म्हणून भाग घेतला. १९६५मध्ये केरळ येथे झालेल्या अखिल भारतीय लेखक परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. १९६९ सालच्या वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मुंबई येथे ते निवर्तले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअ‍ॅप नोटिफिकेशनवरूनच स्पॅम नंबर 'असा' करा ब्लॉक

गेल्या काही महिन्यांत ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनोळखी लोकांचे कॉल किंवा मेसेज आल्यानंतर हजारो लोकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आता या लोकांनी व्हॉट्सअ‍ॅपवरून फसवणूक करायला सुरुवात केली आहे. अनेक सिक्युरिटी फीचर्स असूनही लोक जाळ्यात अडकतात. व्हॉट्सअ‍ॅपवर आता आपण कोणत्याही अनोळखी व्यक्तीला थेट नोटिफिकेशनवरून किंवा फोन लॉक असतानाही ब्लॉक करू शकतो.




जर कोणी तुम्हाला संशयास्पद मेसेज पाठवत असेल, जसं की कोणीतरी तुम्हाला फसवण्याचा प्रयत्न करत असेल किंवा तुम्हाला खोटी आश्वासनं देऊन आमिष दाखवत असेल, तर तुम्ही त्यांना दोन टॅपमध्ये लगेचच ब्लॉक करू शकता. नोटीफिकेशन आल्यावर रिप्लाय बटणाच्या पुढे ब्लॉक बटण असेल. तुम्ही तुमचा फोन लॉक केला असला तरीही तुम्ही त्या व्यक्तीला थेट नोटिफिकेशनमधूनच ब्लॉक करू शकता.

व्हॉट्सअ‍ॅपमध्ये ब्लॉक आणि रिपोर्टचा ऑप्शन आधीच होता, मात्र आता नवीन फीचर आलं आहे. याआधी व्हॉट्सअ‍ॅप अनोळखी नंबरवरून आलेल्या संशयास्पद मेसेजवर इशारे देत असे, पण त्यांना ब्लॉक करण्यासाठी चॅट ओपन करावं लागत होतं. यामुळे समस्या निर्माण झाल्या आणि अनेक वेळा लोक स्पॅम मेसेज ब्लॉक करत नाहीत किंवा चॅट उघडून ते ब्लॉक करायला विसरतात. आता नवीन फीचरमुळे थेट नोटिफिकेशन पाहून स्पॅमर्सना ब्लॉक करता येणार आहे, त्यासाठी फोन ओपन करण्याची गरज नाही.

टू-स्टेप व्हेरिफिकेशन - तुमचं व्हॉट्सअ‍ॅप हॅक होण्यापासून वाचवण्यासाठी सहा अंकी पिन एंटर करा.

डिसेपियेरिंग ऑप्शन्स - फोटो, व्हिडीओ आणि व्हॉईस नोट 'व्ह्यू वन्स' म्हणजेच एकदाच पाहिले जाईल अशा पद्धतीने पाठवा. गोष्टी आणखी खासगी ठेवायच्या असल्यास डिसेपियेरिंग ऑप्शन्सचा वापर करा.

चॅट लॉक - तुम्ही तुमचे महत्त्वाचे चॅट वेगळ्या पासवर्डने लॉक करू शकता. जर कोणी तुमचा फोन पाहिला तरी तो ते चॅट्स पाहू शकणार नाही.

अनोळखी कॉलर - अनोळखी नंबरचा त्रास होऊ नये म्हणून ते सायलेंट करा.

प्रायव्हसी चेकअप व्हॉट्सअ‍ॅपमध्ये प्रायव्हसी चेकअप नक्की करा. म्हणजे तुम्हाला कळेल की तुमच्यासाठी कोणते फीचर्स योग्य आहेत आणि तुम्ही ती चालू करू शकता.

# आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके

**निमित्त**



दीडशे वर्ष पारतंत्र्याच्या काळोखात क्षणाक्षणाला प्राणांची आहुती देऊन स्वातंत्र्याच्या सूर्याला कधीही न मावळण्यासाठी उगवायला लावणाऱ्या देशभक्तांच्या भारताला अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र मिळाले. सच्चे देशभक्त जे अखेरच्या श्वासापर्यंत देशसेवेत समर्पित राहिले आणि कधीही ब्रिटिशांसमोर झुकले नाहीत अशांमध्ये वासुदेव बळवंत फडके यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

रायगड जिल्ह्यातील शिरढोण या गावी ४ नोव्हेंबर १८४५ रोज वासुदेव बळवंत यांचा जन्म झाला. आईचे नाव सरस्वतीबाई तर वडील बळवंत. वासुदेवांना एक भाऊ आणि दोन बहिणी. सुरुवातीपासूनच वासुदेव हे अत्यंत चाणाक्ष बुद्धीचे, मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर प्रचंड प्रभुत्व असणारे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लहानपणापासूनच राष्ट्रप्रेमाची भावना त्यांच्यामध्ये होती. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात त्या प्रमाणे अगदी लहानपणापासून शूरवीरांच्या गोष्टी वाचण्याची त्यांना फार आवड होती. त्यांनी एक व्यायामशाळादेखील बनवली होती. त्या ठिकाणी त्यांची भेट थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुलेंची झाली. याशिवाय त्या ठिकाणी त्यांना शस्त्र चालवण्याचे धडे थोर स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी दिले. वासुदेव हे टिळकांच्या क्रांतिकारी आणि देशभक्तीच्या विचारांनी फार प्रभावित होते.

वासुदेव यांनी आपले सुरुवातीचे शिक्षण कल्याण आणि पुणे येथे राहून केले, पण त्यांना शालेय शिक्षणापेक्षा कुस्ती, घोडेस्वारी यासारख्या शारीरिक कौशल्याची अधिक आवड होती. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांनी शारीरिक कौशल्य शिकण्यास प्राधान्य दिले होते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वडिलांची इच्छा होती की त्यांनी त्यांच्या व्यवसायात उतरावे, परंतु त्यांचे न ऐकता वासुदेव फडके यांनी मुंबई गाठली. तिथे नोकरी करून त्यांनी आपले पुढील शिक्षण सुरू ठेवले. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते पुण्यात आले आणि तेथे मिलिटरी फायनान्स ऑफिसमध्ये लिपिक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. वयाच्या २८व्या वर्षी त्यांचा पहिला विवाह झाला, परंतु पत्नीच्या निधनानंतर त्यांनी दुसरा विवाह केला.


शिरढोण या गावात जन्मलेल्या वासुदेव फडके यांचे आजोबा तिथल्या जवळच्याच कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणी वासुदेव फडके यांना कुस्ती, घोडेस्वारी, तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले. माध्यमिक शिक्षण झाल्यानंतर ते पुण्याला आले आणि सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखासेवेत भरती झाले. तेथे असताना त्यांच्यावर महादेव गोविंद रानडे यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरण होते हे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके हे क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्याही प्रभावात होते. सर्वांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींना या लढ्यात सहभागी करून घेण्याचे महत्त्वाचे असल्याचे वासुदेवांना पटवून दिले. या दरम्यान वासुदेव यांच्या आईची प्रकृती खालावली होती व त्या अक्षरशः अंथरुणाला खिळल्या होत्या. त्यांना भेटण्यासाठी वासुदेव फडके यांनी रजा मागितली होती, पण क्रूर इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना रजा देण्यास मनाई केली. ज्या वेळी ते रजा मिळवून आईला भेटण्यासाठी घरी परतले तोपर्यंत त्यांची आई देवाघरी गेली होती. आपल्या आईला शेवटचे भेटतादेखील आले नाही यामुळे वासुदेव फडके यांच्या मनात ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्ध अतिशय राग होता आणि म्हणूनच त्यांनी संतप्त होऊन अ सरकारी नोकरी सोडून दिली. या प्रसंगामुळे वासुदेव फडके यांच्या आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळाली आणि यानंतर त्यांनी ब्रिटिश सरकारच्या धोरणांविरुद्ध जाहीर भाषणे देण्यास सुरुवात केली.

इंग्रजांच्या राजवटीमध्ये जनतेचे फार हाल होत होते. वासुदेव फडके यांना इंग्रजांच्या राजवटीत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचा मोठा धक्का बसला होता. १८७०च्या दशकात महाराष्ट्रात दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली होती. याकडे इंग्रज सरकार दुर्लक्ष करीत होते. वासुदेव फडके यांनी त्या भागाचा दौरा केला, तेथील लोकांच्या परिस्थितीबद्दल अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष पाहून त्यांना वाईट वाटले. त्यांनी त्यांना जमेल त्या पद्धतीने लोकांना मदत केली आणि ठरवले की भारताला ब्रिटिश राजवटीपासून मुक्त करायचे आणि हाच सर्व समस्यांवरचा उपाय आहे. इथूनच क्रांतीची बीजे पेरली गेली व त्यांची क्रांतिवीर म्हणून सुरुवात झाली.

या कालखंडामध्ये आर्थिक समस्येवर मात करण्यासाठी त्यांनी पहिला दरोडा लोणीजवळ धामारी या गावी टाकला. या दरोड्यांमध्ये त्यांच्या हाती तीन हजार रुपये लागले. २५ ते २७ फेब्रुवारी १८७९ मध्ये लोणी व खेड या गावांवर दुसरा दरोडा टाकला. ८ मार्च १८७९ रोजी जेजुरीजवळील वाल्हे गावावर पुढचा दरोडा टाकला गेला. वासुदेव फडके यांच्या हाताला चार बंदुका, तीनशे रुपये, शंभर रुपयांचे कापड मिळाले आणि यानंतर ब्रिटिश राजवटीविरोधात सशस्त्र उठाव करण्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यासाठी त्यांना मोठ जनसमूह हवा होता. या परिस्थितीमध्ये सुशिक्षितवर्गाकडून पाठिंबा मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी पुणे, मुंबईसारख्या शहरातील सुशिक्षित आणि धनाढ्य भारतीयांकडे मदत मागितली, पण तसे घडले नाही. म्हणून त्यांनी मागासलेल्या जातींचा समूह गोळा करण्यास सुरुवात केली. रामोशी, कोळी, भिल्ल, धनगर यासारख्या अनेक समुदायातल्या लोकांनी त्यांना सहकार्य केले. त्यांनी मागासलेल्या अनेक समाजातील तरुण गोळा केले, त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण दिले, स्वतंत्र सैन्य उभा केले. पुढे त्यांनी ब्रिटिश राजवटीचा नायनाट करण्यासाठी स्वतंत्र क्रांतिकारक फौज उभारण्यास सुरुवात केली. या सशस्त्र उठावाच्या माध्यमातून इंग्रजांच्या नाकामध्ये दम भरून टाकला आणि म्हणूनच जो कोणी वासुदेवाना पकडून देईल त्याच्यासाठी इनाम जाहीर केले गेले. याला प्रत्युत्तर देण्यासाठी वासुदेव फडके यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पकडून देण्यासाठी याहूनही मोठे इनाम जाहीर केले.

अनेक अर्थाने वासुदेव फडके हे सशस्त्र क्रांतीचे प्रणेते होते. प्रत्येक भारतीयाच्या मनात देशभक्तीचे स्फुल्लिंग पेटवणाऱ्या या अद्वितीय देशभक्ताला मनाचा मुजरा.

**-डॉ.सीमा कांबळे, प्राचार्य, श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते बीएड, एमएड कॉलेज, पनवेल**



## आरोग्य प्रहर

# मनुक्यांच्या प्रकारानुसार विविध आरोग्यदायी फायदे

मनुका खाण्याचे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे गुणधर्म आढळतात. लोहाची कमतरता असेल तर मनुका खाण्याचा सल्ला दिला जातो. पोटाशी संबंधित काही समस्या असतील तरी देखील मनुका खाण्याचा सल्ला दिला जातो. मनुक्यात फायबर आणि काही वेगळ्या जीवनसत्त्वांमुळे तुम्ही ते वेगवेगळ्या परिस्थितीत खाऊ शकता.



**१. काळा मनुका**

काळा मनुका हा सामान्यतः सर्व घरांमध्ये असतो. हे द्राक्षांपासून तयार केले जातात. सुकल्यानंतर त्याचा रंग गडद होतो, जे खाल्ल्याने केस गळत नाहीत. आपले आतडे स्वच्छ करते आणि त्वचेचे आरोग्यदेखील सुधारते.

**२. हिरवा मनुका**

हिरवे मनुके पातळ असतात. आकारानेदेखील ते लांब असतात. गडद हिरव्या रंगाचे हे मनुके रसाळ असतात. यात फायबर आणि पोषक तत्व भरपूर असतात, जे हृदयासाठी चांगले असतात. निमियाला प्रतिबंध करण्याचे ते काम करतात. पचनासदेखील मदत करतात.

**३. लाल मनुका**

लाल मनुका हा स्वादिष्ट मनुका आहे, जो लाल द्राक्षांपासून तयार होतो. हे आकाराने मोठे असतात. मधुमेहाचा धोका कमी करण्यात ते मदत करतात. दातांसाठीदेखील चांगले असतात. याशिवाय त्याच्या सेवनाने दृष्टीदेखील सुधारते.

**४. सोनेरी मनुका**

थॉम्पसन सीडलेस द्राक्षांपासून खास तयार केलेल्या तुर्की हिरव्या द्राक्षांवरून सुलताना मनुका हे नाव देण्यात आले आहे. हा मनुका रक्तातील साखर नियंत्रित करतो. याशिवाय जळजळ कमी करतो. पचनासदेखील तो मदत करतो.

मनुक्याचे अनेक प्रकार आहेत. फनुका हा फार गोड नसतो. काळ्या रंगाच्या कोरिंथ द्राक्षांपासून तयार केलेले मनुका खाल्ल्याने घसा खवखवणे बंद होते. याशिवाय रोगप्रतिकारक शक्तीदेखील वाढते. रक्तदाब कमी होतो.

मनुका म्हणजे वाळलेली द्राक्षे असतात, जी द्राक्षांपेक्षा आकाराने लहान असतात. मनुका नैसर्गिकरित्या महिलांच्या आरोग्यासाठी खूप चांगले असतात. यामुळे बद्धकोष्ठता दूर होते आणि हाडेदेखील मजबूत होतात.

# जांबरुंग धरणाचे काम युद्धपातळीवर

## परिसरातील १२ गावे होणार हिरवीगार

**खालापूर : प्रतिनिधी**

१९८०मध्ये मंजूर झालेल्या जांबरुंग धरणाच्या कामाचा पुन्हा शुभारंभ नोव्हेंबरमधे करण्यात आला असून हे काम युद्धपातळीवर सुरू आहे. २०२५पर्यंत हे धरण पूर्ण करण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे.



मागील ४३ वर्षे रखडलेल्या धरणात पाणी साठवले जाणार असुन अविकसित रेल्वेपट्ट्यातील १२ गावांच्या शिवारात हिरवळ दाटून या गावांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होणार आहे. ४३ वर्षांत फक्त २० टक्के काम झाले होते, ते मागील चार महिन्यांत ५० टक्के काम झाले आहे. रखडलेल्या जांबरुंग धरणासाठी दै. रामप्रहरमधून वाचा फोडण्यात आली होती.

मुंबईच्या धनिकांने धरणाच्या बंधाऱ्याला अडचण होईल असे अतिक्रमण केले होते, परंतु लघु पाटबंधारे अभियंता विलास देशमुख यांनी अतिक्रमण हटवून बांधकाम सुरूच ठेवले आहे. धरणातील पाणी कालव्यातून वाहून जाऊ नये यासाठी कालवे बंदिस्त करण्याचा निर्णय घेतला असून यातून आवश्यकतेनुसार पाणी सोडण्यात येणार असल्याचे मुख्य अभियंता विलास देशमुख यांनी सांगितले. या धरणाला उजवा व डावा असे दोन कालवे असणार आहेत.

या धरणाच्या निर्मितीने १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याने या भागाचा विकास होण्यास मदत होणार आहे. १९८० साली मंजूर झालेल्या या धरणासाठी ४९ लाख २० हजार ८७१ रुपये खर्चाची योजना ४३ वर्षांत तब्बल ९१ कोटीच्या घरात पोहचली आहे.

# सिटीस्कॅन मशीन स्वस्तात देतो सांगून फसवणूक

**माणगाव : प्रतिनिधी**




माणगावात सिटीस्कॅन मशीन स्वस्तात देतो असे सांगत डॉक्टरची चार लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना खांदाड येथे घडली. याबाबतची फिर्याद डॉ. इस्माईल हुसेन रहाटविलकर (वय ४०, रा. तनिज पॅलेस, मोरबा रोड खांदाड) यांनी बुधवारी (दि. १४) माणगाव पोलीस ठाण्यात दिल्यावर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेतील आरोपी मोहम्मद कासीम सैफी (रा. गाझियाबाद उत्तरप्रदेश) यांनी फिर्यादी डॉ. इस्माईल हुसेन रहाटविलकर यांना सिटीस्कॅन मशीन स्वस्तात देतो, असे सांगून त्यांच्याकडून चार लाख १० हजार रुपये बँक ट्रान्सफर करून घेतेले, परंतु सिटीस्कॅन मशीन फिर्यादींना दिली नाही. फिर्यादी यांनी आरोपीकडे वारंवार पैशाची मागणी केली असता अद्यापपर्यंत सिटीस्कॅन मशीन व पैसे दिले नाहीत. या प्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# भाजपच्या गाव चलो अभियानास नागरिकांचा प्रतिसाद



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या गाव चलो अभियान अंतर्गत खालापूर तालुक्यातील वावोशी, व्हराळे, शिरवली, नंदनपाडा, नारंगी, चिलठण, शिरवली, जांभिवली बूथचे वॉरिअर, बूथ अध्यक्ष यांच्याबरोबर बैठक तसेच वावोशी गावात अभियानास प्रारंभ झाला. गावोगावी ग्रामस्थांनी या अभियानात सहभाग घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने घेतलेल्या कल्याणकारी योजनांचे माहिती देण्यात आली. या वेळी ग्रामस्थांनी नरेंद्र मोदी सरकारचे आभार मानले आहे.

या वेळी मावळ लोकसभा विस्तारक भूषण जोशी, खालापूर सरचिटणीस रवींद्र पाटिल, संतोष हातनोलकर, रवी मोरे, मोहन घाडगे, बापू देशमुख, राकेश देशमुख, दामू वाघुले, जनार्दन वाघुले, राकेश शिर्के, उपसरपंच दीपाली शिर्के, संदीप बहुड, ग्रामपंचायत सदस्य पूनम बहुड उपस्थित होते. भारतभर अभियान सुरू असल्याचे लोकसभा विस्तारक भूषण जोशी म्हणाले.

# रोह्यात अत्याधुनिक रुग्णालय उभारणार -खासदार सुनील तटकरे

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगरपालिकेत होत असलेल्या विकासकामातील २०० कोटींची मालमत्ता नगर परिषदेच्या मालकीची आहे. हनुमान टेकडीचा परिसर विकसित होत आहे. अत्याधुनिक नाट्यगृह रोह्यात होणार आहे. ही विकासकामे होत असताना अत्याधुनिक पद्धतीचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय रोह्यात उभारणार असल्याचे आश्वासन खासदार सुनील तटकरे यांनी राममारुती चौकात दिले.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या विविधकामांचे भूमिपूजन व लोकार्पण गुरुवारी (दि.१५) करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. नगर परिषदेच्या वतीने शहरातील अष्टमी येथे अद्यावत व्यायामशाळा कामाचे भूमिपूजन, स्व. दत्ताजीराव तटकरे ब्लड बँक व शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारत कामाचे लोकार्पण, श्री हनुमान मंदिर नूतनीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले.



या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मुख्याधिकारी पंकज भुसे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, महेंद्र गुजर, समिर सकपाळ, स्नेहा आंबरे, अप्पा देशमुख, आनंद कुलकर्णी, मोतीशेठ जैन, अरुण करंबे, प्रशांत देशमुख, मकरंद बारटक्के, सुभाष राजे, जालिंदर शेवाळे आदी उपस्थित होते.

या वेळी ना. आदिती तटकरे यांनी त्यांच्या माध्यमातून झालेल्या कामांची माहिती दिली. मकरंद बारटक्के यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन प्रतिक राक्षे यांनी, तर आभार मोतीशेठ जैन यांनी मानले. श्री हनुमान मंदिर नूतनीकरणाच्या पार्श्वभूमीवर रथयात्रा काढण्यात आली होती.

# महाड भाजपच्या वतीने रामभक्तांसाठी अयोध्या वारी

**महाड : प्रतिनिधी**

भारतीयांच्या आस्थेचा आणि श्रद्धेचा विषय असणाऱ्या आयोध्या येथील राममंदिर पूर्ण करून भारतीयांना खरा आनंद मिळवून देण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या रामलल्लाच्या दर्शनासाठी भाजपच्या वतीने देशभरातून 'आस्था' या ट्रेन सोडल्या जात आहेत. गुरुवारी (दि.१५) पनवेल येथून १३०० रामभक्तांना घेऊन आस्था ट्रेन आयोध्याकडे गेली.



या वेळी महाडमधील महिलांना मोफत तर पुरुषांना अत्यंत अल्पदरात ही ट्रेन तर जेवणाची व राहण्याची मोफत सुविधा करण्यात आली आहे. दरम्यान महाड भाजपच्या वतीने महाडमधून जवळपास ३५० रामभक्तांना अयोध्येसाठी पाठवण्यात आले. त्यांच्यासाठी महाड बसस्थानातून सहा बसेस सोडण्यात आल्या.

या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, महिला प्रदेश सरचिटणीस मंजुषा कुद्रीमोती, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष निलीमा भोसले, तालुकाध्यक्षा मंजुषा जोशी, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, चंद्रजित पालांडे, संकेत पोरे, राकेश वाघ, विश्वतेज भोसले, अदिती ताडफळे, रिषभ जैन, प्रमोद पवार आदी भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी या रामभक्तांना शुभेच्छा दिल्या.


**MAHAVITARAN**

**TENDER NOTICE - CORRIGENDUM**

MSEDCL Goregaon Divison, Pen Circle has invited bids for 4 nos of tenders published on e-tender Mahadiscom website on dt. 05.02.2024. Now MSEDCL has revised some Terms & Conditions for all the four tenders (i.e BM_HT, BM_LT, BM_DTC & NSC works). The Announcement for revised terms & conditions are published on MSEDCL Official Website **http://works.mahadiscom.in/eTender/etender.** For any queries, the bidders can contact MSEDCL official Addl.Executive Engineer Mob no - 7875765592, MSEDCL Goregaon Division office, at. Chinchvali, Goregaon Tal:Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO No.: 240 Dt. 05.02.2024**

**Executive Engineer**
**Goregaon Division**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे देवद, ता. पनवेल, जि. रायगड येथील **विजय जगशी छेडा** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे देवद, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| विजय जगशी छेडा | ९ | १/ब | ०-१७-०० | १.७० |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १६/०२/२०२४

**सही /-**
**विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email - vijaybhagat43@gmail.com


# ईसांबेवाडी येथे रस्ता कॉंक्रीटीकरणाचा शुभारंभ

**चौक : प्रतिनिधी**

खालापुरातील ईसांबेवाडी येथे बिर्ला कार्बन इंडिया कंपनीकडून सिमेंट कॉंक्रिट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन सरपंच हिरामण राघो हिलम व कंपनीचे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.



ग्रुप ग्रामपंचायत ईसांबे हद्दीतील ईसांबेवाडी येथील रस्ता हा नव्याने वसलेल्या वाडीसाठी करण्यात आला आहे. ग्रामसेवक परीश नागरे व सरपंच, उपसरपंच सदस्यांनी बिर्ला कार्बन इंडिया कंपनीकडे मागणी केली होती. कंपनीच्या अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या नवीन रस्त्याला मंजुरी दिली. या कामाच्या भूमिपूजनास सरपंच हिरामण राघो हिलम, बिर्ला कंपनीचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी, ग्रामसेवक परीश नागरे, ग्रामपंचायत सदस्य समीर देवघरे, बिर्ला कंपनीचे अधिकारी पुर्निंदो कुमार, विजय अग्रवाल, निखील भामरे, सचिन कंदले, लक्ष्मण मोरे व ग्रामस्थ उपस्थित होते.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-45/23-24 RFX **7000029945** | Work for transportation, dismantling, erection, of EHV Power transformer and ICT and transportation of various EHV equipments under Panvel circle. | Limited to Rs.75.00 Lakhs |
| Tend-48/23-24 RFX 7000029423 **Re-tender** | Work of renovation of earthing at 220kV Kandalgaon s/stn. under EHV (O&M) Division Mahad. | Rs. 49.64 Lakhs |
| Tend-63/23-24 RFX 7000029556 **Re-tender** | Work of replacement of old split air conditioner units by variable refrigerant flow AC system at 400kV R.S. Kharghar | **Rs. 79.33 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 15.02.2024 to 23.02.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.02.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# पोलादपूर तुर्भे खुर्द येथे शेतकरी प्रशिक्षण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तुर्भे खुर्द व तुर्भे बुद्रुक येथे कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२३-२४मध्ये राबविण्यात येत असून या कार्यक्रमादरम्यान दोन्ही गावांतील एकूण ३३ लाभार्थ्यांचे अर्ज प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यापैकी १८ युनिट कुक्कुटपालन १५ युनिट दुग्धव्यवसाय एक पॅक हाऊस ०२ गांडूळ खत प्रकल्प व एक मुरघास प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून तुर्भे खुर्द येथील श्रीराम मंदिरामध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रशिक्षणार्थी लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रशिक्षणासाठी सघन कुक्कुटपालन गट पेण येथील पशुधन विकास अधिकारी डॉ.स्मिता जिंतूरकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पोलादपूरचे पशु विकास अधिकारी डॉ.राजेंद्र भोसले यांनी शेतीपूरक व्यवसायांची माहिती दिली.

तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे पोलादपूर मंडळ कृषी अधिकारी भरत कदम यांनी, सूत्रसंचालन तुर्भे कृषी सहाय्यक निवृत्ती बरकडे यांनी केले, तर आभार सुधाकर उत्तेकर यांनी मानले.


**महावितरण**

**ई-निविदा सुचना**

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता, पेण मंडळांतर्गत Repairing of Dist. Transformer (Upto १०० KVA & above १०० KVA) साठी Empanelled Agency करीता एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीसाठी कामे करण्यासाठी कंत्राटदारांकडुन निविदा क्र. T-०८ ते T-११/२०२३-२४ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर (**https://etender.mahadiscom.in/eatApp**) दि.१६.०२.२०२४ ते दि. ०१.०३.२०२४ (दुपारी २.०० वा) पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. ०१.०३.२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी कार्यकारी अभियंता (प्रशासन) पेण मंडळ भ्रमणध्वनी क्र. ९०२९११२७७७ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्विकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदोबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoncements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**अधीक्षक अभियंता (पेमं)**
**मंडळ कार्यालय, पेण**

PRO No. 341 dtd: 16.02.20204



**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२०२४/ प्र.क्र.०१/५६४/२०२४ दिनांक : १६/०२/२०२४

**शुद्धीपत्रक**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/282/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब,कळंबोली नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्याचे पुर्नपृष्टीकरण करणे. | १६,५२,१०,२०८/- |
| २ | PMC/CE/283/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-क मधील कामोठे नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्याचे पुर्नपृष्टीकरण करणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | २२,६४,७०,३६०/- |
| ३ | PMC/CE/284/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ मधील खारघर नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्यांचे पुर्नपृष्टीकरण करणे. | ३२,९४,०५,४१९/- |
| ४ | PMC/CE/286/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ब व ड येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे. | २५,१७,३८,०४१/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १६/०२/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. १२२/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १९/०१/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक जागरुक टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्र.. रोहा औद्योगिक क्षेत्राला जोडलेल्या इमर्जन्सी एस्केप रस्त्याचे पुनःपृष्ठाकण करणे तसेच धाटाव, महादेववाडी, वाशी व लांदर गावातील अंतर्गत रस्ते विकासीत करणे. |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १६/०२/२०२४ ते ०१/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

इच्छुकांनी वरील कामाकरीता दिनांक २१/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २३/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## निवडक

### दोन अपघातांत एक ठार, एक जखमी

**पनवेल :** परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार एक जखमी झाल्याची घटना घडली. गव्हाण फाटा ब्रिजच्या कच्च्या रस्त्यावर शिवम सिन्हा (वय २७) हा दुचाकीसह खाली पडल्याने झालेल्या अपघातात तो स्वतः गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या अपघातात ऋतिक घरत (रा. धाकटी जुई) हा इलेक्ट्रिक बाईक (एमएच ४६ सीएन ८२११) घेऊन एएससी कॉलेज गोरील सेवा रस्त्यावर जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गिकेवरून जात होता. दरम्यान पुढील कारचालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने दुचाकीने कारला धडक दिली. यात दुचाकी चालक जखमी झाला. दोन्ही अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पैशांची बॅग दोघांनी केली लंपास

**पनवेल** : मानेवर काहीतरी टाकून शर्ट काढण्यास सांगून ५० हजार रुपये असलेली पैशांची बॅग दोघांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रवींद्र बळीराम यांनी ५० हजार रुपये बँक ऑफ इंडिया, नवीन पनवेल येथून काढले. ते बॅगेत ठेवून बँकेतून बाहेर आले असता एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या मानेजवळ काहीतरी टाकले. त्यामुळे मानेवर खाज येऊ लागली. काहीतरी असेल, पाणी टाकावे लागेल असे सांगून एकाने पाणी आणले व शर्ट काढण्यास सांगितले. त्यांनी शर्ट काढला व हातातील पैशांची बॅग बाजूला ठेवली. तेवढ्यात त्याचा साथीदार आला व तो बॅग चोरून निघून गेला. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### महिलेच्या दागिन्यांसह रकमेची चोरी

**पनवेल** : एसटी बसस्थानकात एका बसमध्ये महिला प्रवासी चढत असताना तिच्याकडे असलेला सोन्याच्या दागिन्यांसह रोख रकमेचा पाऊच अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. वासंती मेहेतर (५७) या बसमध्ये चढत असताना त्यांच्याकडील पाऊचमध्ये असलेले सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम असा मिळून एकूण १,६२,००० रुपये किमतीचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### सहसंपर्क प्रमुखपदी शिरीष पाटील

**नवी मुंबई** : शिवसेनेच्या बेलापूर विधानसभा



मतदारसंघाचे सहसंपर्क प्रमुखपदी शिरीश काशिनाथ पाटील यांची नियुक्ती नवी मुंबई जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांनी केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार आणि प्रसार करू तसेच शिवसेना पक्षवाढीसाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सहसंपर्क प्रमुखपदी नियुक्तीनंतर बोलताना शिरीष पाटील यांनी सांगितले. पाटील यांच्या नियुक्तीमुळे बेलापूर विभागात शिवसेनेला बळ मिळेल, असे उपनेते विजय नाहटा यांनी सांगितले.

# जेएनपीएमध्ये उभारणार निर्यात कृषीमालासाठी केंद्र



**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीए बंदर परिसरात शेतकऱ्यांसाठी कृषीमालावरील प्रक्रिया व साठवणूक केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. २७ एकरच्या भूखंडावर २८४ कोटी खर्च करून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी जेएनपीए प्रशासनाने केंद्र सरकारला प्रस्ताव पाठविला आहे. बंदरातून निर्यात करण्यात येणारा शेतीमाल कमी खर्चात आणि कमी वेळेत सहजपणे निर्यात करण्यासाठी निर्यातभिमुख कृषी प्रक्रिया आणि साठवणूक सुविधा उभारण्यासाठी डीबीएफओटी मॉडेलमधील ॲग्रो प्रोसेसिंग आणि स्टोरेज युनिट प्रकल्प उभारण्याची तयारी जेएनपीएने सुरू केली आहे.

उरण येथील जेएनपीएच्या मालकीच्या २७ एकर क्षेत्रावर २८४.१९ कोटी खर्चाच्या या प्रकल्पाला बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजुरीही देण्यात आली आहे. पीपीपी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचा डीपीआर अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती जेएनपीएच्या अधिकाऱ्यांनी दिली.

भारतातून प्रामुख्याने चहा, कॉफी, तांदूळ, गहू, कापूस, तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, तेलबिया, फळे, फुले, भाजीपाला, सागरी उत्पादने, साखर, मांस व कातडी, काजू इत्यादी कृषी मालाची निर्यात केली जाते. देशातील शेतमालाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या खूप मोठी आहे, परंतु खरेदीदार मात्र संख्येने मर्यादित आणि संघटित असतात. अशा संघटित असलेल्या खरेदीदारांकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत या निर्यातभिमुख कृषी प्रक्रिया आणि साठवणूक सुविधा केंद्र उभारण्याबाबत तयार करण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली.

# पनवेलमध्ये २७ फेब्रुवारीला डाक अदालत

**पनवेल** : डाक विभागाच्या निवृत्ती वेतनधारकाच्या समस्या सोडवण्यासाठी पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई यांनी २७ फेब्रुवारी रोजी पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय, पनवेल मुख्य पोस्ट ऑफिस इमारत येथे पेन्शन डाक अदालत आयोजित करण्यात आली असून तक्रारदारांनी या डाक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा डाक अधीक्षक रायगड सुनील थळकर यांनी केले आहे.

अर्ज करण्याची शेवटची तारीख २० फेब्रुवारी आहे. तक्रारदाराने अर्ज करताना निवृत्तीधारकांचे नाव, कार्यालयाचे नाव, निवृतीची तारीख, पिपिओ क्रमांक, पोस्ट ऑफिसचे नाव जिथून पेन्शन घेतली जात आहे, पोस्टाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, थोडक्यात तक्रार अशा पद्धतीने अर्ज करावा. तक्रारदारांनी आपला अर्ज नवी मुंबई रिजनसाठी पोस्टमास्टर जनरल, नवी मुंबई रिजन कार्यालय, दुसरा माळा, पनवेल मुख्य पोस्ट ऑफिस इमारत, नवीन पनवेल, ४१०२०६ येथे पाठवावा.

# गव्हाण विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा

## चेअरमन अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इ. बारावीच्या फेब्रुवारी २०२४मध्ये होत असलेल्या बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शुभचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख वक्ते म्हणून पनवेल येथील चांगू काना ठाकूर ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे यांनी विविध उदाहरणांसह प्रबोधनात्मक मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी, विद्यार्थ्यांनी या विद्यालयाच्या यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन करून विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन करून जीवनात यशस्वी व्हावे, अशा शुभेच्छा दिल्या. या वेळी ते २५ वर्षांपूर्वीची उद्घाटन प्रसंगाची आठवण करीत भावूक झाले.

कार्यक्रमासाठी गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, वसंत पाटील, जयवंत देशमुख, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, ॲड. रुपेश म्हात्रे, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे व पर्यवेक्षक अरुण जोशी, प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे विद्यालय, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, सर्व शिक्षक उपस्थित होते.

प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. माणिकराव घरत यांनी शिक्षक प्रतिनिधी म्हणून मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. इ. बारावीची विद्यार्थिनी रुपाली मंजुळकर व इ. अकरावीचा विद्यार्थी सोयम काटे याने मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्राजक्ता काशिद हिने केले तर आभारप्रदर्शन आरती शेजूळ हिने केले.

### नूतन इमारतीचा रौप्य महोत्सव

*महाराष्ट्रातले दानशूर व्यक्तिमत्व आणि रयत शिक्षण संस्थेचे थोर देणगीदार विद्यालयाचे आधारस्तंभ आणि रयत संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या एक कोटी १० लाख रुपयांच्या आर्थिक देणगीतून बांधलेल्या तत्कालीन नवीन वास्तूच्या उद्घाटन समारंभास २५वर्षे पूर्ण झाल्याचनिमित्त अरुणशेठ भगत व मान्यवरांच्या शुभहस्ते केक कापून रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला.*



# खैराच्या लाकडांची तस्करी; ट्रकसह दोन जण ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल वनविभागाने मध्यरात्रीच्या सुमारास कळंबोली परिसरात केलेल्या धडक कारवाईत लाखो रुपयांची खैराची लाकडे विनापरवाना घेऊन जाणारा ट्रक ताब्यात घेतला असून याप्रकरणी ट्रकचालकासह त्याच्या साथीदारावर कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल वनविभागाचे अधिकारी ज्ञानेश्वर सोनवणे व वनपाल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या विशेष पथकाला लाखो रुपये किमतीची खैराची लाकडे घेऊन वापी बाजूकडून एक ट्रक कोकणातील सावर्डे या ठिकाणी अवैध पद्धतीने घेऊन जात असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार मध्यरात्रीच्या सुमारास या पथकाने सापळा रचून संशयित ट्रकला अडवून त्याची तपासणी केली असता. त्या ट्रकमध्ये लाखो रुपये किमतीची खैराच्या झाडांची लाकडे आढळून आल्याने सदर मुद्देमाल ट्रकसह पनवेल वनविभागाने जप्त केला आहे.

ट्रकचालक अक्रम युसूफ खान शेख वय (वय २४, रा. सुरत) आणि मन्सुरी महम्मद शहीद सलीम (२७, रा. सुरत) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अर्थसंकल्प विश्लेषण स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि.१५) स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या जयंतीनिमित्त वाणिज्य विभागातर्फे आंतर महाविद्यालयीन अर्थसंकल्प विश्लेषण स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील सुमारे ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन अर्थसंकल्पावर त्यांचे विचार मांडले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून चांगू काना ठाकूर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. काळूराम ढोरे यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये साक्षी सिंग प्रथम, आर्यन गवारे विवेकानंद कॉलेज चेंबूर द्वितीय, तसेच रोशन गुप्ता बीएनएन कॉलेज भिवंडी तृतीय क्रमांक पटकाविला.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. विशाल देशमुख (वाणिज्य विभाग प्रमुख) प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. नम्रता पारिक, प्रा. मनोज यादव व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# महाकुंभ शतकुंडी कामधेनू महायज्ञासाठी नवी मुंबईतून मदत

**नवी मुंबई** : अमरावती येथे गो महाकुंभ-शतकुंडी कामधेनू महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे. १५ फेब्रुवारी रोजी या महायज्ञास सुरुवात झाली असून २५ फेब्रुवारीपर्यंत हा महायज्ञ सुरू राहणार आहे.

या महायज्ञासाठी शंकराचार्य उपस्थित राहणार आहेत. मुख्य म्हणजे या महायज्ञासाठी देशभरातून मदत केली जात असताना, नवी मुंबईदेखील यात मागे राहिलेली नाही. नवी मुंबईतून शेकडो किलो तूप व पूजा सामग्री या महायज्ञासाठी देण्यात आली आहे. वैदिक संस्कृती सेवा संघटनतर्फे या महातज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबई प्रमुख बाबाजी इंदोरे यांनी नवी मुंबईतून ही मदत देऊ केली असून बाबाजी इंदोरे यांनी केलेल्या आवाहनाला नवी मुंबईतून प्रतिसाद मिळून नागरिकांनी आपली मदत या महायज्ञासाठी देऊ केली आहे. देशभरातील साधू संत तसेच भाविक या महायज्ञासाठी उपस्थित राहणार आहेत.

# ॲड.श्रद्धा खंधडीया यांना पीएचडी प्रदान



**मोहोपाडा** : छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाच्या वतीने ॲड. श्रद्धा खंधडीया यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

ॲड. खंधडीया यांनी क्रीटीकल ॲनालिसीस ऑफ इनसॉल्व्हेन्सी ॲण्ड बॅकक्रप्सी कोड इन इंडीया या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना प्रो. डॉ. एस. पी. मिश्रा यांचे अमुल्य मार्गदर्शन लाभले.

# पनवेल मनपाच्या गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा या मोहिमेंतर्गत पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण गुरुवारी (दि.१५) आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी पर्यावरण विभाग उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, स्पर्धेचे परीक्षक शिवानंद बालवदे, शामराव पुंडे, प्रशांत शेडगे, सचिन शिंदे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या पर्यावरणपूरक गणपती उत्सव उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेतलेल्या पर्यावरणदूतांनाही या वेळी प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले.

## स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे

**घरगुती दीड दिवस गणपती**

| | |
|---|---|
| इंद्रनील जाधव | प्रथम क्रमांक |
| भारत घरत | द्वितीय क्रमांक |
| विजय गोरेगावकर | तृतीय क्रमांक |

**घरगुती पाच दिवस गणपती**

| | |
|---|---|
| आकाश पाटील | प्रथम क्रमांक |
| माधुरी डांगे | द्वितीय क्रमांक |
| तानाजी तोत्रे | तृतीय क्रमांक |

**घरगुती दहा दिवस गणपती**

| | |
|---|---|
| सुयोग सोनावणे | प्रथम क्रमांक |
| तेजस्वी वाघ | द्वितीय क्रमांक |

**सार्वजनिक गणपती मंडळ**

| | |
|---|---|
| मोराज सार्वजनिक मंडळ | प्रथम क्रमांक |
| श्री गणेश मित्र मंडळ | द्वितीय क्रमांक |
| कस्तुरी प्लाझा (तक्का) | तृतीय क्रमांक |

# सीकेटी महाविद्यालयात रस्ते वाहतूक सुरक्षा अभियानांतर्गत कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या कला संघटना व राज्यशास्त्र विभाग तथा तालुका विधिसेवा प्राधिकरण, पनवेल बार असोसिएशन आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन गुरुवारी (दि. १५) करण्यात आले.



पनवेल विधी सेवा प्राधिकरणाचे पीएलव्ही शैलेश कोंडसकर यांनी, रस्ते वाहतूक विषयाच्याबाबत सजग राहण्याचा संदेश देत कार्यशाळेच्या उद्दिष्टांबाबत माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी, रस्ते वाहतुकीबाबत असणाऱ्या नियमांच्या दैनंदिन उपयोजनातील उदासीनतेबाबत भाष्य केले.

सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी सचिन विधाते यांनी, जगभरातील एकूण रस्ते अपघातातील १२ टक्के अपघात भारतात होत असल्याचे सांगितले, तसेच रस्त्यावरून वाहन चालवत असताना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी, अपघाताची कारणे, अपघात झाल्यानंतर संबंधित परिस्थिती कशी हाताळावी याचे उदाहरण देवून विद्यार्थ्यांना जागरूक केले. सहदिवाणी न्यायाधीश सोनावणे यांनी, वाहन चालवताना शासनमान्य अनुज्ञाप्ती धारण करण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित केले. पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील रस्ते अपघात टाळण्यासाठी लहान-लहान गोष्टींकडे लक्ष देण्याबाबत सजग राहणे आवश्यक असल्याचे सांगून रस्ते अपघातापासून सुरक्षेची चतुःसुत्री ४ ई- इंजिनिअरिंग, एन्फोर्समेंट, एज्युकेशन, इमर्जन्सी याबाबत महिती दिली.

अध्यक्षीय भाषणात जिल्हा न्यायाधीश संतोष शिंदे यांनी, गती-मती-नीती या मानवी जीवनाला दिशा देणाऱ्या त्रिसूत्रीच्या सकारात्मक पद्धतीने प्राधान्यक्रमाने अंमलबजावणी करण्यावर भर देण्याबाबत भाष्य केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील व कला संघटनेचे अध्यक्ष डॉ. आर. ओ. परमार यांनी आभार मानली. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे निरीक्षक चंद्राकंत माने, कला संघटनेचे अध्यक्ष डॉ. आर. ओ. परमार, आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

या वेळी महाविद्यालयाच्या कलाशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, पनवेल बार असोसिएशनचे प्रवीण बाबर, संदीप कित्ते, व वकील संघटनेचे खजिनदार ॲड. धनराज तोकडे, ऑडिटर ॲड. विशाल मुंडकर, कार्यकारिणी सदस्य ॲड. अमित पाटील, ॲड. छाया म्हात्रे, वरिष्ठ लिपिक सुजाता महाडिक, रिटेनर लॉयर ॲड. सुयश कामेरकर, याबरोबर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील संदीप कित्ते, अजय कराळे, अशोक वारे, रोहित कोळप, पूनम भोसले, सुनील जठार, महेश माने, प्रदीप मानकर, मोनिका साळुंके, नरेंद्र औट्टी आदी पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### भाजपकडून ऋग्वेद बुल्लूचा सत्कार



**मुरूड** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल शिष्यवृत्ती योजना परीक्षेत मुरूड येथील सर एस.ए. हायस्कूलचा विद्यार्थी ऋग्वेद कल्पेश बुल्लू याने ७२% गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. याबद्दल भाजपकडून ज्येष्ठ नेते अण्णा कंधारे यांनी ऋग्वेदचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन सत्कार केला. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष बाळा भगत तसेच प्रकाश चव्हाण, रूपेश जामकर, ओमकार गुरव, समीर किरकिरे आदी उपस्थित होते.

### खालापुरातील शाळांमध्ये गोळ्यावाटप



**चौक** : राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत खालापूर तालुक्यातील एक वर्ष ते १९ वर्षे वयोगटातील मुलामुलींना जंतनाशक गोळ्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयात देण्यात आल्या. ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे या ठिकाणी कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, शिक्षक, अंगणवाडीसेविका, आशा स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदविला. जंत दोषामुळे बालकांमध्ये ॲनिमियाचा सर्वाधिक धोका उद्भवतो शिवाय आतड्यांना सूज येणे, पोटदुखी, भूक मंदावणे, उलट्या, अतिसार तसेच इतर आजार उद्भवतात. या आजारांना आळा घालण्यासाठी वर्षातून दोन वेळा बालकांनी जंतनाशक गोळी घेणे गरजेचे आहे.

### नीलम पवार यांचा सत्कार




**पाली :** सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेतर्फे सौंदर्य स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन केलेल्या नीलम श्याम पवार यांचा सन्मानचिन्ह आणि बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. वऱ्हाड जांभूळपाडा येथील निलम पवार यांनी वाशी मुंबई येथील मेसमेरिक मिस इंडिया पेगिएन्ट २०२४ या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करीत फर्स्ट रनरअपचा मानाचा किताब जिंकला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, उपाध्यक्ष शंकर काळभोर, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, सल्लागार सुरेश शिंदे, रमेश सागळे, शिवाजी दळवी, जनार्दन घोंगे, गणपत डिगे, सरचिटणीस राजू पातेरे, खजिनदार विजय पवार, उपखजिनदार विजय जाधव आदी उपस्थित होते.

### संत सेवालालमहाराज जयंती उत्साहात



**नागोठणे** : कोएसाच्या मेहेंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रोहा येथे गुरुवारी (दि.१५) संत सेवालालमहाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य रमेश मोसे यांच्या हस्ते संत सेवालालमहाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. या वेळी ज्येष्ठ शिक्षक डी. एम. पवार, दुपारसत्र प्रमुख के. आर. पाटील, शिक्षक प्रतिनिधी चेतन भोई, भिवा कोकरे, सुविनयकुमार अहिरे, सुनील भालेराव, शिक्षिका कुंदा फुलगावकर, मनीषा निमन, कीर्ती पाटील, मनीषा पाटील लेखनिक संतोष मुसळे, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमानिमित्त विद्यार्थी व सेवकांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### अश्विनी मोंडे यांचा विश्वविक्रम



**मुरुड** : मोस्ट स्कॉट इन एट हावर्स फिमेल यांच्या वतीने इनफिनिटी मॉल, मुंबई या ठिकाणी अश्विनी आनंदराव मोंडे या महिलेने आठ तासांत ११ हजार ८०६ बैठका काढून महिला गटात जागतिक पातळीवर विक्रम करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद केली आहे. मोंडे यांचे माध्यमिक शिक्षण भालगाव येथील द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय, तर बारावीपर्यंतचे शिक्षण एस.एस. ज्युनिअर कॉलेज, मुरुड येथे झालेले आहे. त्यांना प्रशिक्षक सुनील कांबळे, डॉ. धनंजय मोरे व आदर्श सोमानी यांचे सहकार्य लाभले. उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# जिल्हा एड्स प्रतिबंध विभागाचे कार्य समाधानकारक

## अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. विजय कंदेवाड यांची विभागाला भेट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी वडाळा, मुंबई येथील अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, आयसीटीसी, एआरटी केंद्र, रक्तपेढी, गुप्तरोग विभागास सदिच्छा भेट दिली. या विभागाचे कामकाज पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.




अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शितल जोशी यांनी डॉ.विजय कंदेवाड यांच स्वागत केले. या भेटीदरम्यान डॉ. विजय कंदेवाड यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी डापकू कार्यालयामार्फत केल्या गेलेल्या कामाचा सविस्तर आढावा दिला. त्यामध्ये रायगड जिल्ह्यामध्ये एकूण १४ स्टँड आलोन आयसीटीसी, एक मोबाईल आयसीटीसी व्हॅन, तीन टेस्ट पीपीपी, ६३ एफआयसीटीसी प्राथमिक आरोग्य केंद्र, १२३ एफआयसीटीसी पीपीपी, तीन एआरटी केंद्र, तसेच ११ लिंक एआरटी केंद्र, एक डीएसआरसी केंद्र, पाच रक्तपेढी, तीन एनजीओ, एक सीएससी केंद्र कार्यरत असल्याचे सांगण्यात आले. लिंकवर्कर कार्यक्रमामध्ये आठ लिंकवर्कर कार्यरत असल्याचे सांगण्यात आले.

एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०२३पर्यंतचा अहवाल सादर करण्यात आला. त्यामध्ये जनरल तपासणीचे काम हे १३२ टक्के असल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये तीन हजार ५३२ व्यक्ती या एचआयव्ही पॉझिटिव्ह तर एएनसी तपासणीचे काम हे १०९ टक्के असल्याचे सांगण्यात आले. त्यामध्ये १६४ एएनसी या एचआयव्ही पॉसिटीव्ह असल्याचे सांगण्यात आले. त्या ऑन एआरटी झाल्या असल्याबाबत सांगितले. अलिबाग येथे २०१२पासून एआरटी केंद्र सुरू झाले असून त्यापूर्वी रायगडमधील एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्ण हे मुंबई येथे रजिस्टर होत होते.

पॉझिटिव्ह एएनसीच्या बालकांची डीबीएस तपासणी सहा विक, सहा महिने, १२ महिने, १८ महिन्यांनी केली जाते. त्यामध्ये पॉझिटिव्ह आल्यास त्यांना एआरटी उपचार सुरू केले जातात. रायगडव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातून आलेल्या बालकांचीसुद्धा डीबीएस तपासणी केली जात असल्याचे सांगण्यात आले. रायगड जिल्ह्यातील सर्व बालके निगेटिव्ह असून प्राथमिक अवस्थेत पालकांकडून बालकाला होणारा एचआयव्ही संसर्ग रोखण्यामध्ये शासनाला १०० टक्के यश आले आहे.

तळोजा जेल येथे मोबाइल आयसीटीचीवरील समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्यामार्फत एचआयव्ही तपासणी केली जाते. तेथे आलेले एचआयव्ही पॉझिटिव्हना एआरटी उपचार दिले जातात, परंतु पॉझिटिव्ह पेशंट हे बेलवर सुटल्यानंतर ते कोठे जातात, राहतात ते औषधोपचार घेतात की, नाही याची माहिती मिळत नाही. याकरिता साथी या संस्थेची मदत घेण्यास सांगितले.

रायगड जिल्ह्यातील सर्व आयसीटीसीमार्फत एचआयव्ही तपासणी बरोबरच व्हीडीआरएल, एचबीएस्सी, एचसीव्ही तपासण्या केल्या जातात, परंतु सध्यस्थितीत व्हीडीआरएल, एचबीएस्सी, एचसीव्ही किटची कमतरता आहे. एचबीएस्सी, एचसीव्ही किट एनएचएम अथवा इमरजेंसी फंड यामधून मिळविणेकरीता प्रस्ताव ठेवणे बाबत सांगण्यात आले. व्हीडीआरएलची तपासणी जनरल लॅब किंवा एचएलएल यांच्यामार्फत करून घेण्याबाबत सांगण्यात आले.

## अमली पदार्थविरोधी जनजागृती फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा नार्को को-ऑर्डीनेशन सेंटर समिती आयोजित, माणुसकी प्रतिष्ठान यांच्या सहयोगाने बुधवारी (दि.१४) अलिबागमध्ये अमली पदार्थविरोधी जनजागृतीसाठी प्रभातफेरी काढण्यात आली. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सकाळी ८ वा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, माणुसकी प्रतिष्ठान अलिबागचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, नार्को को-ऑर्डीनेशन सेंटर समिती एनसीओआरडीचे सदस्यांच्या उपस्थितीत या प्रभातफेरीला प्रारंभ झाला.

पोलीस पेट्रोल पंप, तांबोळी हॉस्पिटल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, एसटी स्टॅण्ड, मारूती नाका या मार्गाने जाऊन पोलीस अधीक्षक कार्यालय येथे सांगता करण्यात आली. प्रभातफेरीमध्ये जेएसएम कॉलेज, आरसीएफ कॉलेज, कोएसो अरूणकुमार वैद्य ज्युनिअर कॉलेज, सेंट मेरी इंग्लिश मिडीयम स्कूल, लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ, उज्ज्वल भविष्य तांत्रिक विद्यालय वरसोली, पीएनपी कॉलेज आदींमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

त्याचप्रमाणे अलिबाग तालुक्यातील तेजस्विनी फाउंडेशन, सुरभी स्वयंसेवी संस्था, अंधश्रद्धा निमूर्लन संस्था, रोटरी क्लब, सह्याद्री प्रतिष्ठान, प्रिझम फाउंडेशन, स्पर्धा विश्व ॲकेडमी आदी सामाजिक संस्थांचे सदस्य, पोलीस अधिकारी असे एकूण सुमारे ६०० जण सहभागी झाले होते.

## हिरवळ महाविद्यालयात महिलांसाठी सेमिनार




**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स कॉलेजमधील महिला विकास कक्ष व करियर कट्टामार्फत महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी बँकिंग योजनांवर सेमिनार आयोजित करण्यात आला होता.

या सेमिनारचे प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक व्यवस्थापक दि अण्णासाहेब सावंत सहकारी बँक तेजस वनारसे उपस्थित होते. प्राचार्य सुदेश कदम यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. वनारसे यांनी महिलांना व्यावसायिक जगतामध्ये सक्षम बनविण्याच्या उद्देशाने बँकेच्या महिलांसाठी असणाऱ्या विविध योजनांविषयी सखोल माहिती दिली. ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी, महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रगतीसाठी सेमिनारच्या उपयुक्ततेवर अभ्यासपूर्ण विचार मांडले.

संचालिका सोनाली धारिया यांनी माहिती तंत्रज्ञान, कॉम्प्युटर सायन्स आणि सायन्स क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांसाठी स्वागतार्ह वातावरण निर्माण करण्यासाठी या सेमिनारचे महत्त्व यावर मत मांडले. मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी, व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील लैंगिक तफावत कमी करण्यासाठी या कार्यक्रमाचे महत्त्व यावर आपले विचार मांडले. उपप्राचार्य राकेश वडवलकर यांनी सेमिनारचा समारोप करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## निबंध स्पर्धेत दिक्षा वाघमारे, पोस्टर स्पर्धेत आर्यन भारती प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

नार्को को-ऑर्डीनेशन सेंटर समितीतर्फे आयोजित निबंध स्पर्धेत दिक्षा रवींद्र वाघमारे हिने तर पोस्टर स्पर्धेत आर्यन श्रीधर भारती याने प्रथम क्रमांक मिळवला.



नार्को को-ऑर्डीनेशन सेंटर समिती यांच्यातर्फे अमली पदार्थविरोधी जनजागृतीकरीता रायगड जिल्हा पोलीस दलाने पोलीस ठाणेस्तरावर व्यसनाधिनता एक सामाजिक समस्या या विषयावर इ. सातवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांकरीता पोस्टर्स स्पर्धा व ११वी ते १२ वीचे विद्यार्थ्यांकरीता निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बुधवारी (दि. १४) रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात करण्यात आले.

पोस्टर स्पर्धेत तसेच निबंध लेखन स्पर्धेत एकूण ३००० विध्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. निबंध लेखन स्पर्धेत कोएसो जनरल अरूणकुमार वैद्य हायस्कूलची विद्यार्थिनी दिक्षा रवींद्र वाघमारे हिने प्रथम क्रमांक मिळवला. तन्वी जयेंद्र सुतार हिने द्वितीय तर मयुरी गणेश खारकर याने तृतीय क्रमांक मिळवला. पोस्टर्स स्पर्धेत आर्यन श्रीधर भारती याने प्रथम, अभिराज सुयोग फडके याने द्वितीय व शुभम नारूगोपालकर याने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना नार्को जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे रायगड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, माणुसकी प्रतिष्ठान अलिबागचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, नार्को को-ऑर्डीनेशन सेंटर समिती एनसीओआरडीचे सदस्य हे उपस्थित होते.

## तटरक्षक दलातर्फे मुलांना जहाजाचे दर्शन



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडमधील तटरक्षक दलातर्फे नगर परिषद शाळेतील मुलांना 'अचूक' नावाच्या जलद गतीने चालणाऱ्या जहाजाचे दर्शन घडवण्यात आले.

मुलांना प्रथमच मोठे अत्याधुनिक यंत्रणेने सज्ज असलेले जहाज पहावयास मिळाल्याने सर्व मुलानांच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणित झाला होता.

नगर परिषदेच्या १ ते ४ क्रमांकाच्या शाळांमधील सुमारे ६० विद्यार्थ्यांना ही संधी प्राप्त करून देण्यात आली. डेप्युटी कमांडर ऑफिसर कॅप्टन अमोलकुमार मुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

या वेळी विद्यार्थ्यांना या जहाजावरील शस्त्रसाठा, त्याचप्रमाणे जहाजाची यांत्रिक माहिती देण्यात आली. जहाजावर असणारी अत्याधुनिक यंत्रणासुद्धा दाखविण्यात आली. बोटीचा वेग व देशविरोधी कृत्य करणाऱ्या व्यक्तीच्या बोटीचा पाठलाग कसा केला जातो, याबाबत माहिती देऊन तटरक्षक दलाचे कार्य समजावून सांगण्यात आले.

या वेळी मुख्याध्यपक राजेश भोईर, अविनाश ठाकूर, महेंद्र हावरे, दिनेश भोईर आदी शिक्षक उपस्थित होते.

## रायगड सांस्कृतिक महोत्सवात पोवाडा, लोकगीतांचा नजराणा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कोकणातील पारंपरिक लोककला त्याचबरोबर मराठी सण उत्सव परपरांवर आधारित पोवाडा, लोकगीते, पारंपरिक गीत तसेच गायक नंदेश उमप यांच्या मराठी सांगीतिक कार्यक्रमाने बुधवार (दि.१४) रायगडकर तल्लीन झाले.

सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर सुप्रसिद्ध गायक नंदेश उमप यांचा मराठी सांगीतिक कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पोवाडा, लोकगीते, पारंपरिक गीतांच्या बहारदार कार्यक्रमात रसिक तल्लीन झाले. शुभेच्छा देताना पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, सुप्रसिद्ध गायक नंदेश उमप यांचा मराठी सांगीतिक दिमाखदार कार्यक्रम अलिबाग येथे झाला. शुक्रवारी (दि.१६) सायंकाळी ४ ते ६ या वेळेत स्थानिक कलावंताचा आगरी संस्कृतीचे दर्शन घडविणारा कार्यक्रम होणार आहे, तर सायंकाळी ७ ते रात्रौ १० या वेळेत महानाट्य शिवबा होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले.



**माणगाव : वाकडाई देवीपालखी सोहळ्यात जि.प.शाळा उतेखोलवाडीच्या विद्यार्थी, शिक्षक आणि व्यवस्थापन समिती तसेच पालक उत्साहाने सहभागी झाले. विद्यार्थ्यांमध्ये प्रभू श्रीराम यांची वेशभूषा गौरव मोरे, माता सीतेच्या भूमिकेत आराध्या गोरेगावकर, लक्ष्मणच्या भूमिकेत राहूल मोहिते, बजरंगबलींच्या भूमिकेत तनिष्क जाधव व विद्यार्थी लेझीम पथकासह सहभागी झाले होते.** (छाया : सलीम शेख)



# इंग्लंडचा पलटवार; बेन डकेटचे शतक

## भारताविरुद्ध दुसऱ्या दिवसअखेर २ बाद २०७ धावा

**राजकोट : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडने बेन डकेटच्या शतकाच्या जोरावर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३५ षटकानंतर २ बाद २०७ धावा केल्या आहेत. इंग्लंड भारताच्या तुलनेत २३८ धावांनी पिछाडीवर आहे.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडकडून सलामीवीर बेन डकेट आणि जो रूट नाबाद परतले. बॅन डकेट १३३ धावा करून खेळत आहे, तर जो रूट नऊ धावा करून क्रीजवर आहे. बेन डकेटने इंग्लंडच्या बॅझबॉल रणनीतीचे पूर्णपणे पालन करीत केवळ ८७ चेंडूंत




### अश्विन @ ५००

भारत आणि इंग्लंड यांच्यात राजकोटमध्ये पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यातील इंग्लंडच्या पहिल्या डावात रविचंद्रन अश्विनने जॅक क्रॉलीला बाद करीत कसोटीत ५०० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. हा पल्ला गाठणारा तो जगातील नववा क्रिकेटपटू ठरला आहे. त्याचबरोबर तो भारताचा दुसरा आणि एकूण पाचवा फिरकी गोलंदाज आहे.

शतक झळकावले. हे त्याचे भारतातील पहिले शतक असून त्यात त्याने विक्रम केला आहे. जॅक क्रॉली १५, तर ओली पोप ३९ धावांवर बाद झाला. भारताकडून रविचंद्रन अश्विन आणि मोहम्मद सिराज यांना प्रत्येकी एक विकेट मिळाले.

तत्पूर्वी दुसऱ्या दिवशी भारतीय संघाला ३३१ धावांवर सहावा धक्का बसला. कुलदीप यादव चार धावा करून जिमी अँडरसनचा बळी ठरला. यानंतर रवींद्र जडेजाला जो रूटने बाद केले. जडेजाने २२५ चेंडूंत ११२ धावांची खेळी खेळली. यानंतर ध्रुव जुरेल आणि रवी अश्विन यांच्यात चांगली भागीदारी झाली. ध्रुव १०४ चेंडूंत ४६ धावा करून आणि अश्विन ३७ धावा करून बाद झाला. जसप्रीत बुमराहने २६ धावांचे उपयुक्त योगदान दिले.



# नमो चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील वेलशेत येथे भारतीय जनता पक्ष व श्री जाखमाता क्रिकेट संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भाजप पेण-सुधागड-रोहा विधानसभा प्रमुख प्रसाद भोईर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १६ ते १८ फेब्रुवारीदरम्यान टेनिस क्रिकेट नमो चषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे शानदार उद्घाटन झाले.

पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच, भाजप युवा नेते राजेंद्र लवटे यांच्या पुढाकाराने होत असलेल्या स्पर्धेत विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजप नेते किशोर म्हात्रे, पिगोंडे सरपंच संतोष कोळी, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, तालुका उपाध्यक्ष अपर्णा सुटे, वैशाली लवटे, तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुधाकर पारंगे, भाजप माजी तालुका अध्यक्ष मनोज धात्रक, शिक्षण सेल तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाळे, अंकुश सुटे, राजन दुबे, प्रल्हाद पारंगे, मोरेश्वर म्हात्रे, ज्ञानेश्वर शिर्के, पिगोंडे उपसरपंच शैलेश शेलार, माजी उपसरपंच गंगाराम मिनमीने, विठोबा माळी, गणेश घाग, सुदेश येरुणकर, दयाराम ताडकर, हरिश्चंद्र घासे, सुधीर पारंगे, कृष्णा पारंगे, शीतल नांगरे, प्रियांका पिंपळे, मुग्धा गडकरी यांच्यासह क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंची चमक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडच्या किकबॉक्सिंग खेळाडूंनी नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या तिसऱ्या ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. या खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधित्व करताना तीन सुवर्ण आणि दोन कांस्यपदके पटकाविली.

या चॅम्पियनशिपमध्ये इराक, तुर्की, सिंगापूर, नेपाळ, ग्रेट ब्रिटन, कझाकिस्तान आणि भारतसह १८ देशांचा सहभाग होता. रायगड किक बॉक्सिंग असोसिएशन सचिव निलेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली स्टॅन्ली जैन याने सुवर्णपदक व कांस्यपदक (किक लाईट), श्रेयश गायकवाड व आशिष मुंडे यांनी सुवर्णपदक (पॉइंट फाइट) आणि प्रज्वल दरेकरने कांस्यपदक जिंकले. या खेळाडूंना सहाय्यक प्रशिक्षक परशुराम शेट्टीगिरी व वरद केणी यांचे मार्गदर्शन लाभले.

वाको इंडिया किकबॉक्सिंगचे अध्यक्ष संतोष अग्रवाल, महाराष्ट्रअध्यक्ष संतोष म्हात्रे, उपाध्यक्ष मंदार पनवेलकर यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## 'रणजी'त शार्दुलचे शानदार पुनरागमन

### २१ धावांत सहा विकेट्स

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा वेगवान गोलंदाज अष्टपैलू शार्दुल ठाकूरने रणजी सामन्यांमध्ये आपली ताकद दाखवून दिली आहे. आसामविरुद्धच्या रणजी सामन्यात शार्दुलने मुंबईकडून खेळताना सामन्याच्या पहिल्या दिवशी अवघ्या २१ धावांत सहा विकेट्स घेतल्या. त्याच्या दमदार गोलंदाजीमुळे मुंबईने आसामला पहिल्या डावात अवघ्या ८४ धावांत गुंडाळले.

आयपीएलपूर्वी शार्दुलची ही गोलंदाजी खूप महत्त्वाची आहे. वास्तविक, गेल्या काही सामन्यांत तो लयीत दिसला नाही. शार्दुलने रणजी सामने खेळून आपला फॉर्म शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

### प्रथम श्रेणी कबड्डी स्पर्धा

# सुनील स्पोर्ट्स, गोलफादेवी सेवा, शिवशक्ती क्रीडा, विजय क्लब संघ उपांत्यपूर्व फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

सुनील स्पोर्ट्स, शिवशक्ती क्रीडा, विजय क्लब यांनी विजय नवनाथ मंडळाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या पुरुष प्रथम श्रेणी कबड्डी स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक दिली. गोलफादेवीला मात्र याकरिता ५-५ चढायांच्या डावापर्यंत संघर्ष करावा लागला.

सेनापती बापट मार्ग, लोअर परेल येथील फिनिक्स टॉवर शेजारील मैदानात सुरू असलेल्या पाचव्या दिवशी वरळी कोळीवाडा येथील गोलफादेवीने प्रभादेवीच्या यंग प्रभादेवीचा कडवा संघर्ष ५-५ चढायांच्या डावांत ३७-३३ (७-३) असा मोडून काढला. पूर्वार्धात १२-०९ अशी आघाडी घेणाऱ्या गोलफादेवीला यंग प्रभादेवीने पूर्ण डावात ३०-३० असे बरोबरीत रोखले. ५-५ चढायांत गोलफादेवीने बाजी मारली. धनंजय सरोज,



सनी कोळी यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. रुपेश किर, स्मित साळवी यांचा खेळ यंग प्रभादेवी संघाच्या विजयाकरीता थोडा कमी पडला.

ना. म. जोशी मार्गच्या सुनील स्पोर्ट्सने शेजारच्या बंड्या मारुतीला ३५-२३ असे नमविले. रोहन जाधव, शोहेब मुल्ला, जय बागल सुनील कडून, तर प्रणित देसाई, ऋषिकेश गोपाळे बंड्या मारुतीकडून उत्कृष्ट खेळले. शिवशक्तीने विजय बजरंगचा कडवा प्रतिकार २५-२२ असा संपुष्टात आणला. मध्यांतराला एक गुणाने पिछाडीवर पडलेल्या शिवशक्तीने मध्यांतरानंतर आपला खेळ उंचावत ही किमया साधली. अभिषेक कोरे, साई चौघुले यांच्या उत्कृष्ट चढाया त्यांना संतोष वारकरीची मिळालेली पकडीची साथ त्यामुळेच शिवशक्तीला हा विजय साकारता आला. आकाश निकम, सिद्धेश खांडेकर यांचा खेळ विजय बजरंगला विजयी करण्यास कमी पडला.

शेवटच्या सामन्यात दादरच्या विजय क्लबने साऊथ कॅनराला ३८-२८ असे पराभूत केले. पहिल्या डावात चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात १८-१६ अशी विजयकडे आघाडी होती. राज नाटेकर, रोहन तिवारी, विजय दिवेकर यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. साऊथ कॅनराचे अमन शेख, किरण गर्जे चमकले.

# शालेय बुद्धीबळ स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ (ट्रस्ट) मुंबई व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित श्री शिवाजी मंदिर शालेय मुला-मुलींच्या बुद्धीबळ स्पर्धेत १२६ खेळाडूंमध्ये विजेतेपदासाठी १८ फेब्रुवारी रोजी चुरस राहील. मुंबई शहर जिल्हा बुद्धीबळ संघटना मान्यतेने ही स्पर्धा ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ वर्षाखालील अशा आठ वयोगटात दादर येथील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे.

प्रत्येक वयोगटातील पहिल्या दहा मुलांसाठी व पहिल्या पाच मुलींसाठी चषक दिले जाणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष सुधीर सावंत यांनी दिली. श्री शिवाजी मंदिर बुद्धीबळ स्पर्धा जिंकण्यासाठी लोबो फेरद्यन, आरिष गांधी, यश टंडन, अहान कतौरुका, भाविनी मल्लिक आदी आंतरराष्ट्रीय गुणांकित सबज्युनियर बुद्धीबळपटूसह उदयोन्मुख खेळाडूदेखील निकराच्या लढती देतील.

स्विस लीग पद्धतीने ही स्पर्धा किमान चार साखळी फेऱ्यांमध्ये १५-१५ मिनिटे अधिक तीन सेकंद इन्क्रिमेंटच्या वेळ मर्यादेत होणार आहे. उदयोन्मुख बुद्धीबळपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी ७ ते १४ वयोगटातील प्रत्येक विजेत्यांमधील सर्वाधिक गुणांची सरासरी असणाऱ्या एका गटविजेत्यास प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा विशेष पुरस्कार देणार असल्याचे श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त बजरंग चव्हाण यांनी जाहीर केले आहे. स्पर्धेची नोंदणी १७ फेब्रुवारीपर्यंत खुली आहे.

### श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

# खो-खो स्पर्धेत महिलांमध्ये शिवनेरी, पुरुषांमध्ये एमपीएलला विजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर व उपनगरात श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा थरार वेगवेगळ्या २२ ठिकाणी सुरू आहे. मुंबईतील शिवाजी पार्क येथे खो-खो स्पर्धा सुरू असून या स्पर्धेत खुल्या गटात महिलांमध्ये शिवनेरी सेवा मंडळाने, तर पुरुषांमध्ये एमपीएलने विजेतेपद पटकाविले. मुलींचे विजेतेपद शिवनेरीला आणि कुमारांचे ओम साईश्वरने जिंकले.

स्पर्धा महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई महापालिका आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई पोलीस, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ व मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील संबंधित क्रीडा संघटना यांच्या सहकार्याने मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत.

खो-खोच्या खुल्या गटात महिलांमध्ये शिवनेरी सेवा मंडळाने



अमरहिंद मंडळाचा ५-३ (मध्यंतर ५-१) असा एक डाव दोन गुणांनी धुव्वा उडवला. या सामन्यात शिवनेरीच्या आरुषी गुप्ता ( ३.५० व ४ मि. संरक्षण) व मुस्कान शेखने (दोन्ही डावात नाबाद राहत ३.१०, २.२० मि. संरक्षण) धमाकेदार संरक्षणाची खेळी करीत अमरहिंदच्या तोंडाला फेस आणला. कशिश पाटेकर (तीन गुण) याने सामन्यात निर्णायक खेळी करीत विजय साजरा केला. पराभूत अमरहिंद मंडळाच्या प्रांजळ पाताडे (१.२० मि. संरक्षण), रूद्रा नाटेकर व रिद्धी कबीर (प्रत्येकी १.१० मि. संरक्षण) यांचे प्रयत्न अपुरे पडले.

पुरुषांच्या सामन्यात एमपीएल संघाने एसपीएल संघाला ९-७ असा एक डाव दोन गुणांनी पराभव केला. या सामन्यात एमपीएलच्या वेदांत देसाई (१.४०, २.२० मि. संरक्षण व एक गुण), जनार्दन सावंत (१.४०, २.१० मि. संरक्षण) हितेश आंग्रे (१.५० मि. संरक्षण व तीन गुण), शुभम शिंदे (१.१०, १.४० मि. संरक्षण व एक गुण), ओमकार मिरगळ (दोन गुण) यांनी खेळ दमदार खेळ करत विजय साजरा केला. पराभूत एसपीएलच्या प्रतिक राज (१.२० मि. संरक्षण) व पवन नाचणकर (१.१० मि. संरक्षण व एक गुण) जोरदार खेळी करण्यात अपयशी ठरले.

मुलींच्या (१७ वर्षाखालील) अंतिम सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने ओम साईश्वर सेवा मंडळाचा ३-१ असा दोन गुणांनी पराभव केला. शिवनेरीच्या मुस्कान शेख (नाबाद ५ मि. संरक्षण), सिद्धी शिंदे (३.२० मि. संरक्षण) व आरुषी गुप्ता (नाबाद १.४० मि. संरक्षण) यांनी तर ओम साईश्वरच्या निर्मिती परब (४.३०, ३.१० मि. संरक्षण) काजल परब (नाबाद १.५० मि. संरक्षण व एक गुण) यांना पराभव टाळता आला नाही.

मुलांच्या (१७ वर्षाखालील) अंतिम सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिराचा ९-५ असा एक डाव चार गुणांनी पराभव केला. या सामन्यात ओम साईश्वरच्या साई टेम्बुलकर (४ मि. संरक्षण), सार्थक माड्ये (२.३० मि. संरक्षण व दोन गुण), राजेश मंडल (२ मि. संरक्षण) यांनी विजश्री खेचून आणली. पराभूत श्री समर्थच्या अनिश शिरोडकर (२.२० मि. संरक्षण), देवर्ष पानगले व अथर्व खोचाडे (प्रत्येकी १.२० मि. संरक्षण व एक गुण) विहंग पाटील (१.३० मि. संरक्षण) यांनी परभवात चांगली कामगिरी केली.



अलिबाग : कल्याण ते अलिबाग प्रवासाचा १०० किमीचा टप्पा सायकलवरून प्रवास करून कल्याण परिसरातील सायकलपटूंनी पूर्ण केला.




पुणे : भाजपचे खोपोली शहर सरचिटणीस अजय इंगुलकर व प्राजक्ता सुर्वे यांचा विवाह नुकताच झाला. या विवाह समारंभाला रायगड जिल्ह्यातून भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत खालापूर निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, अशोक पाटील, भाजप खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, महिला मोर्चा शहराध्यक्ष शोभा काटे, उपाध्यक्ष दिलीप पवार, जिल्हा वैद्यकीय सेलचे बबन नागरगोजे, विधानसभा विस्तारक हेमंत नांदे, कार्यकर्ते करण यादव, सागर काटे आदी उपस्थित होते. (छाया : जयवंत माडपे)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com